मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

मुंबई कार्यालय
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ७७३५

पालघर कार्यालय
२०८/बी, लोकमान्य बिल्डींग, तालुका पंचायत समिती कार्यालयासमोर, पालघर, ४०१४०४ मो. ९८९२९६८७२५

नाशिक कार्यालय
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८

वितरण
मो. नं. ८४२४९३६४३६

नाशिक | सोमवार, ७ एप्रिल २०२५ | वर्ष: ६ | अंक:१०९ | पाने-८ | किंमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३

## माझ्यासारखा आमदार पुढील काळात तुम्हाला मिळणार नाही - अजित पवार

**बारामती , दि. ६ प्रतिनिधी**

विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करायला लागल्यापासून मी जितकी विकासकामे केली तितकी कामे आगामी काळात कोणीच करु शकणार नाही, हा माझा दावा आहे, अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपल्या भावना बोलून दाखविल्या. ते बारामतीमध्ये बोलत होते. पंचायत समितीमध्ये आयोजित कार्यक्रमात बोलताना अजित पवार यांनी हा दावा केला. ते म्हणाले, मी जेवढं काम केल आहे, तितकं काम करणारा आमदार तुम्हाला या पुढील काळात मिळणार नाही, हा माझा दावा आहे. तुम्ही आजपर्यंत बारामतीचे प्रतिनिधीत्व केलेले अनेक आमदार सुरुवातीपासून म्हणजे 1952 पासून आजपर्यंत आमदार झालेल्या प्रत्येकाची कारकीर्द तुम्ही बघा, कोणी किती काम केले आणि तुम्ही मला 1991 मध्ये आमदार म्हणून निवडून दिले, माझ्या कालावधीत किती काम झाले, हे तुम्ही सर्वांनी पाहिले आहे.

## अग्राग्रलेख
## खरीखरी

### शेतकरी आणि कर्ज

महाराष्ट्राच्या शेतकऱ्यांवर आता नवी संक्रांत आलेली दिसते. जानेवारी महिन्याची जी संक्रांत होती. तेव्हा शेतकऱ्यांच्या वर कर्जाची असलेली संक्रांत दूर होईल, अशी आशा होती. मात्र 31 मार्चच्या अवघे दोन दिवस आधी आपल्या अर्थमंत्र्यांनी शेतकऱ्यांनी कर्जफेड करावी. असा उपदेश म्हणा किंवा आदेश म्हणा किंवा त्याला काहीही म्हणा तो दिला आहे. जानेवारी महिन्यापासून कर्ज फेडीचे आश्वासन अस्तित्वात असल्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी आपल्यावर मुला-मुलींची लग्नं करून टाकली. आता आपले कृषिमंत्री म्हणतात की, शेतकरी कर्ज घेतात आणि कर्जमाफीची वाट बघत बसतात. कर्जमाफी झाली की त्या पैशातून साखरपुडा आणि लग्नकार्य करतात. माणिकराव कोकाटे यांच्यासारख्या सुजाण कृषी मंत्र्यांनी असे विधान करून शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळले. असे म्हटले तर अजिबात वावगे ठरणार नाही. कर्जमाफी केली नाही आणि शेतकऱ्यांनी कर्ज भरले. तर मुला-मुलींच्या लग्नासाठी शेतकऱ्याला खाजगी सावकाराकडून कर्ज काढावे लागते. हे शेतकरी अंबानीच्या पोराच्या लग्नाप्रमाणे आंतरराष्ट्रीय किर्तीची लग्न करू शकणार नाहीत. तरीही आपल्या एपतीप्रमाणे त्यांना लग्न करणे भागच असते. शेतकऱ्यांच्या बाबतीत अशी अपमानजनक भाषा वापरणे. यावरूनच आपल्या राज्यात शेतकरी किती हतबल आहे तेच दिसून येते. आता बँकांनी आणि लग्नसराईच्या काळात शेतकऱ्यांना कलम 101 नुसार नोटीसा पाठवलेल्या आहेत. या नोटीसा सुमारे 23 लाख शेतकऱ्यांना पाठवण्यात आलेल्या आहेत. सरकारने कर्जमाफी या विषयावर आपले हात झटकल्यावर कर्ज देणाऱ्या बँकांना वसुली करणे भागच आहे. आता या कर्जदार शेतकऱ्यांचा वाली कोण आहे. ते कुणालाच सांगता येणार नाही. पण 31 मार्चच्या दोन दिवस आधी कर्जमाफी होणार नाही. हे सांगितल्यावर आता कर्ज भरणे तर सोडाच. खरीप पिकांसाठीही खर्चाची जुळणी कशी करावी. हा सुद्धा मोठा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा ठाकलेला आहे. चांगली शेती असलेल्या म्हणजेच चांगले आर्थिक उत्पन्न असलेल्या शेतकऱ्यांच्या मुलांनाही शेतकरीच असलेले बाप सुद्धा आपली मुलगी देत नाहीत. हे सध्याचे जळजळीत वास्तव आहे. त्यापेक्षा एखाद्या सरकारी किंवा निमसरकारी नोकरीत काम करणाऱ्या कारकूनाला किंवा चपराशी असला तरी त्याला मुलगी सहज मिळते, अशी स्थिती आहे. आता सरकारने सर्व शेतकऱ्यांनी आपल्या मुलामुलींची लग्नं नोंदणी पद्धतीने करावी. असा कायदा लागू करावा आणि जो कोणी शेतकरी मोठा खर्च करून लग्न करेल. त्याच्या विरोधात कायदा करून कारवाई करावी. म्हणजे शेतकऱ्यांना कर्जमाफी मागण्याची वेळ येणार नाही. आता बऱ्याच प्रमाणात मुलीच्या बापाला हुंडा मागणाऱ्या मुलाच्या बापाचा आवाज हळूहळू समाप्त होत आहे, नव्हे तो संपलाच आहे. फक्त मुलाचे लग्न होत आहे, हेच फार मोठे भाग्य आहे. असेच मुलांच्या बापांना वाटते. त्यामुळे लग्नात हुंड्यामध्ये होंडा मागणेही बंद झालेले आहे. आता बँकांच्या वसुलीकडे आपण वळूया. शेतकऱ्यांचे नेते राजू शेट्टी यांनी सरकारने शेतकऱ्यांना दिलेले कर्जमाफीचे आश्वासन पाळावे. असे आवाहन केलेले आहे. शेतकऱ्यांना संघटित करून राजू शेट्टी हे स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या माध्यमातून राज्यभर आंदोलन उभे करत आहेत. जर बँकांचे अधिकारी वसुलीकरता आले. तर त्यांना चोपून काढू, असे राजू शेट्टी म्हणतात. शेट्टी यांनी काहीही म्हटले तरी चोपून काढणे वगैरे गोष्टी जो कोणी करेल. तो शेतकरी जिवंतपणे मरेल, हे तुम्ही लिहून ठेवा. कारण कायदेच तसे आहेत. आस्मानी आणि सुलतानी या दोघांच्याही कचाट्यात शेतकरी आधीच पिचलेला आहे. गेल्या पाच-सहा दिवसांत राज्यात झालेल्या अवकाळी पावसाने आणि गारपिटीने शेतकरी आधीच गार झालेला आहे. सरकार कर्जमाफी करणार म्हणून जिल्हा बँक, सोसायटी आणि इतर राष्ट्रीयकृत बँकांची वसुली थांबली होती. सरकारने हात झटकल्यावर आता बँकांनाही मोकळे मैदान मिळाल्याने शेतकऱ्यांवर कर्ज वसुलीचा वरवंटा फिरू लागलेला आहे. म्हणजे आई जेवू घालेना आणि बाप भीक मागू देईना, अशी शेतकऱ्यांची अवस्था झालेली आहे. त्यातच अजून एक मुद्दा खूप महत्त्वाचा आहे. तो शेतमालाला मिळणाऱ्या भावाबद्दलचा आहे. यावर्षी शेतकऱ्यांना तुरीचे उत्पन्न बऱ्यापैकी झाले आहे. पण तुरीचे दर नेहमीपेक्षा 40 टक्क्यांनी उतरलेले आहेत. कापूस आणि सोयाबीनचे पीक घेणे परवडतच नाही. भाजीपाल्यालाही भाव मिळत नाही. त्यामुळेच शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढत आहेत आणि आपल्या श्रीमंत राज्यातील गरीब सरकार पळ काढत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची अवस्था त्रिशंकू सारखी झालेली आहे. त्याला धड रडताही येत नाही आणि धड हसताही येत नाही. सरकारने कर्जमाफीचा फेरविचार करावा. असे म्हटले तर सरकारच इतके कर्जबाजारी आहे की, कर्जाच्या बाजारात सरकारचीच पत घसरलेली दिसते. या सर्व परिस्थितीमुळे सरकार आणि शेतकरी यांना, कुणी काय आणि कसे करावे हे सुद्धा समजेनासे झालेले आहे.
हा गोंधळी लोकांचा गोंधळ किती शेतकऱ्यांचा बळी घेईल. हे कोणालाच सांगता येणे शक्य नाही.

nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023

## मोदींच्या हस्ते देशातील पहिल्या 'व्हर्टिकल लिफ्ट सागरीपुला'चे उद्घाटन

**रामेश्वरम, दि. ६ वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तामिळनाडूतील रामेश्वरम येथे भारतातील पहिल्या व्हर्टिकल लिफ्ट सागरीपुल' पांबनचे उद्घाटन केले. यासोबतच त्यांनी राज्यात इतर अनेक विकास प्रकल्पही सुरू केले. या कार्यक्रमापूर्वी, भारतीय रेल्वेने या नवीन रेल्वे पुलाचा एक सुंदर व्हिडिओ प्रसिद्ध केला होता. रेल्वे मंत्रालयाने म्हटले होते की समुद्रावर बांधलेला हा रेल्वे पूल भूतकाळ आणि भविष्यकाळाला जोडतो. रामनवमीच्या दिवशी ते जनतेसमोर सादर केले जाईल आणि या काळात पंतप्रधान मोदी तेथे उपस्थित राहिल्यामुळे, रामेश्वरममध्ये सुरक्षा वाढवण्यात आली आहे.

दुपारी १ वाजताच्या सुमारास, पंतप्रधानांनी नवीन पांबन रेल्वे पूल जनतेला समर्पित केला. त्यांनी रामेश्वरम आणि तांबरम (चेन्नई) दरम्यान नवीन रेल्वे सेवेला हिरवा झेंडा दाखवला. त्याने तटरक्षक दलाचे जहाजही पाठवले. पंतप्रधान मोदी रामेश्वरममधील प्रसिद्ध रामानाथस्वामी मंदिरात भेट देतील आणि पूजा करतील. ते ८,३०० कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या रेल्वे आणि रस्ते प्रकल्पांचे भूमिपूजन आणि उद्घाटन करतील.

व्हर्टिकल लिफ्ट ब्रिज म्हणजे असा पूल जो गरज पडल्यास पाण्याच्या पृष्ठभागाच्या वर उचलता येतो. उभ्या पुलाची उभारणी केल्याने मोठी जहाजे



त्या ठिकाणाहून सहज जाऊ शकतील.

पूल मजबूत करण्यासाठी, त्यात स्टेनलेस स्टील, विशेष संरक्षक रंग आणि वेल्डेड जॉइंट्सचा वापर करण्यात आला आहे. यामुळे त्याची ताकद आणि आयुष्य वाढले आहे. भविष्याचा विचार करून, त्यात दोन रेल्वे ट्रॅकची तरतूद करण्यात आली आहे. समुद्राच्या हवेमुळे होणाऱ्या गंजापासून संरक्षण करण्यासाठी त्यावर एक विशेष पॉलिसिलॉक्सेन लेप आहे.


या पुलाच्या उद्घाटनामुळे रेल्वेला वाहतूक सुरळीत करण्यास मदत होणार आहे. जड आणि वेगवान गाड्या देखील पुलावरून सहज जाऊ शकतील.

केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितले की, पांबन पूल हा रेल्वेच्या इतिहासातील सर्वात महत्वाच्या पुलांपैकी एक आहे. समुद्रावर बांधलेला हा पहिला उभ्या लिफ्ट ब्रिज हा तमिळ इतिहास, संस्कृती, प्राचीन तमिळ संस्कृती आणि तमिळ भाषेतील महान स्थापत्य चमत्कारांपैकी एक आहे. त्याच्या अनोख्या रचनेमागे पंतप्रधान मोदींचा प्रगतीशील विचार आहे. तामिळनाडूच्या रामनाथपुरम जिल्ह्यातील हा पूल गंजामुळे नष्ट झालेल्या जुन्या संरचनेची जागा घेईल. देशाच्या रेल्वे पायाभूत सुविधांमध्ये हे एक महत्त्वाचे पाऊल ठरेल.

**पुलाची वैशिष्ट्ये**

- रामेश्वरम बेटाला भारताच्या मुख्य भूमीशी जोडणारा पूल
- नवीन पांबन रेल्वे पूल रामेश्वरम बेटाला भारताच्या मुख्य भूमीशी जोडतो आणि जागतिक स्तरावर भारतीय अभियांत्रिकीचा एक मोठा उपक्रम आहे. यासाठी सुमारे ५५० कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्च आला आहे.
- हा पूल २.०८ किलोमीटर लांबीचा आहे. यामध्ये ९९ स्पॅन (खांबांमधील अंतर) आहेत आणि त्याचा उचलण्याचा भाग ७२.५ मीटर लांब आहे, जो १७ मीटर उंचीपर्यंत वाढू शकतो. यामुळे मोठी जहाजे सहज जाऊ शकतात आणि रेल्वे सेवा कोणत्याही व्यत्ययाशिवाय सुरू राहू शकतात.

## अयोध्येत श्रीराम जन्मोत्सव
## ४ मिनिटांचा सूर्य तिलक





**अयोध्या, दि. ६ वृत्तसंस्था**

आज श्री रामनवमीचा उत्सव संपूर्ण भारतवर्षात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येत आहे. दुपारी १२ वाजता जन्मोत्सवाचा उत्सव मोठ्या उत्साहात संपन्न झाला. जगभरातून आलेल्या भाविकांनी आयोध्येतील राम मंदिरात सूर्य तिलक होतानाचे दृष्य आपल्या डोळ्यात साठवले. याआधी आज सकाळी ९:३० वाजता भगवान श्री रामाची विशेष अभिषेक पूजा संपन्न झाली. ही पूजा सुमारे तासभर सुरू होती. यानंतर श्री रामाचा भव्य श्रृंगार करण्यात आला. सूर्याभिषेकाचे प्रसारण सगळ्या जगाने पाहिले. या सोहळ्याचे थेट प्रक्षेपण करण्यात आले होते.

आज श्री राम नवमीच्या पार्श्वभूमीवर अयोध्येतील सर्व मंदिरे विविधरंगी फुलांनी सजवण्यात आली होती. आज श्री रामाच्या दर्शनासाठी देशभरातून मोठ्या संख्येने भाविक अयोध्येत दाखल झाले आहेत. सकाळी ९:३० वाजता जन्मात्सवाचा कार्यक्रम सुरू झाला. सर्वात आधी रामलल्लाचा अभिषेक विधी संपन्न झाला.

राम मंदिरातील हा दुसरा जन्मोत्सव संपन्न होत आहे. सकाळी १०:३० वाजता एक तासभर भगवान श्री रामाचा श्रृंगार करण्यात आला. त्यानंतर नैवेद्य दाखवण्यात आला. दुपारी १२ वाजता राम लल्लाचा जन्मोत्सव सोहळा सुरू झाला. मंदिरात पूजा-आरती आणि सूर्यतिलक संपन्न झाला. यावेळी सूर्याची किरणे राम लल्लाच्या मुर्तीवर कपाळावरील टीळ्यावर येउन स्थिरावली आणि सूर्यतिलक झाला. याआधी शनिवारी सूर्य तिलकची ट्रायल घेण्यात आली होती. जन्मोत्सवाचे थेट प्रक्षेपण करण्यात आले. दुपारी १२ वाजता रघुकुलात रामलल्लाच्या जन्माने भक्तांमध्ये आनंदाचे आणि भक्तीभावाचे वातावरण अनुभवायला मिळाले.

## भाजपच्या कार्यकर्त्यांची ऊर्जा-उत्साह प्रेरणादायक - पंतप्रधान नरेंद्र मोदी

**नवी दिल्ली, दि.६ वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी भारतीय जनता पक्षाच्या स्थापना दिनानिमित्त पक्षाच्या कार्यकर्त्यांना शुभेच्छा दिल्या. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'X' वर केलेल्या पोस्टमध्ये पंतप्रधानांनी म्हटलंय की, 6 एप्रिल हा दिवस भारतीय जनता पक्षाच्या देशाच्या प्रगतीसाठी असलेल्या अतुलनीय बांधिलकीच्या पुनःप्रत्ययाची जाणीव करून देतो. देशातील जनतेनेही पक्षाच्या चांगल्या शासनाचा अनुभव घेतला आहे, ज्याचे प्रतिबिंब मागील वर्षांमध्ये मिळालेल्या एतिहासिक जनादेशांमध्ये दिसून आले आहे.' ते पुढे म्हणातात, 'भाजपच्या स्थापना दिवसानिमित्त सर्व कार्यकर्त्यांना शुभेच्छा. गेल्या कित्येक दशकांपासून ज्यांनी आपल्या पक्षाला बळकट करण्यासाठी स्वतःला समर्पित केले, अशा सर्वांचे आज स्मरण करतो.



हा महत्त्वाचा दिवस भारताच्या प्रगतीसाठी आणि विकसित भारताच्या स्वप्नाच्या पूर्ततेसाठी आपल्या अतुलनीय बांधिलकीची पुनःप्रतीज्ञा घेण्याची प्रेरणा देतो,' असे पोस्टमध्ये लिहिले आहे. भाजपच्या शासनधोरणाला जनतेचा मिळालेला पाठिंबा अधोरेखित करताना त्यांनी लिहिले, 'भारतीय जनता आपल्या पक्षाचे चांगले शासन पाहत आहे, ज्याचे प्रतिबिंब गेल्या काही वर्षांमध्ये मिळालेल्या एतिहासिक जनादेशांमध्ये दिसून आले आहे. लोकसभा निवडणुका असोत, विविध राज्यांमधील विधानसभा निवडणुका असोत किंवा देशभरातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका असोत, जनतेने भाजप आणि मित्र पक्षांच्या सरकारवर विश्वास दाखवला आहे. आमचे सरकार समाजाची सेवा करत राहतील आणि सर्वांगीण विकास सुनिश्चित करतील.' 'भाजपचे कार्यकर्ते हे पक्षाचा कणा आहेत. सर्व परिश्रमी कार्यकर्त्यांना भाजपच्या स्थापना दिनाच्या हार्दिक शुभेच्छा. ते समाजाच्या प्रत्येक घटकामध्ये, देशाच्या प्रत्येक भागात अविरतपणे २४ तास मेहनत करून गरिब, वंचित आणि उपेक्षित लोकांची सेवा करत आहेत. तसेच ते आपल्या उत्तम शासनाच्या अजेंड्याचा प्रसार करत आहेत. याचा मला अभिमान आहे. कार्यकर्त्यांची ऊर्जा आणि उत्साह खरोखर प्रेरणादायक आहे,' असेही पोस्टमध्ये नमूद केले आहे.

## देशात नवा वक्फ कायदा लागू
## राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची मंजुरी

**नवी दिल्ली, दि. ६ वृत्तसंस्था**

वक्फ सुधारणा विधेयक संसदेच्या दोन्ही सभागृहात मंजूर झाल्यानंतर आता राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनीही या विधेयकाला मंजुरी दिली आहे. यानंतर आता वक्फ संशोधन विधेयक-२०२५ चे कायद्यात रुपांतर झाले आहे. मात्र, या नव्या कायद्याला काँग्रेस, एआयएमआयएम आणि आम आदमी पक्षाने वेगवेगळ्या याचिका दाखल करत सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. याशिवाय, देशाच्या विविध भागात मुस्लीम संघटना या विरोधात निदर्शनेही करत आहेत. तसेच ऑल इंडिया मुस्लीम पर्सनल लॉ बोर्डाने (एआयएमपीएलबी) या विधेयकाविरोधात देशव्यापी आंदोलन करण्याचा इशाराही दिला आहे.



महत्वाचे म्हणजे, हा कायदा मुस्लीम विरोधी नाही, तर याचा उद्देश पक्षपात आणि वक्फ मालमत्तांचा दुरुपयोग रोखणे असल्याचे केंद्र सरकारचे म्हणणे आहे. दरम्यान, ऑल इंडिया मुस्लीम पर्सनल लॉ बोर्डाने या कायद्यासंदर्भात चिंता व्यक्त करण्यासाठी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेण्यासाठी वेळही मागितला होता. लोकसभेत वक्फ सुधारणा विधेयकाच्या बाजूने २८८ तर विरोधात २३२मते पडली होती. तसेच, राज्यसभेत या बीलाच्या बाजूने १२८ तर विरोधात ९५ मते पडली. महत्वाचे म्हणजे, राज्यसभेत विरोधी पक्षांकडून आणले गेलेले सर्व सुधारणा प्रस्ताव आवाजी मतदानाने फेटाळण्यात आले.

दरम्यान, ऑल इंडिया मुस्लीम पर्सनल लॉ बोर्डाने (एआयएमपीएलबी) शनिवारी या विधेयकाविरोधात देशव्यापी आंदोलन करण्याचा इशाराही दिला आहे. एआयएमपीएलबीच्या वतीने दिल्ली, मुंबई, कोलकाता, हैदराबाद, बेंगळुरू, चेन्नई, विजयवाडा, मलप्पुरम, पटना, रांची, मलेरकोटला आणि लखनौ येथे मोठ्या प्रमाणावर निदर्शने करेल.

या कायद्यासंदर्भात बोलताना, "सत्ताधारी पक्षाने बहुमताचा दुरुपयोग करत हे विधेयक जबरदस्तीने लादले असल्याचे काँग्रेसचे राज्यसभा खासदार अभिषेक मनु सिंघवी यांनी म्हटले आहे. याउलट, या कायद्यामुळे मुस्लीम महिलांना लाभ होईल आणि वक्फ मालमत्तेच्या प्रबंधनासंदर्भात पारदर्शिता येईल, असे सरकारने म्हटले आहे.

## तुमच्या मुलाची सुपारी घेतलीये सावध राहा
## शिंदे गटाच्या नेत्याला निनावी पत्र

**बुलढाणा, दि. ६ प्रतिनिधी**


शिवसेना शिंदे गटाच्या एका बड्या नेत्याला इशारा देणारं पत्र मिळाल्यानं खळबळ उडाली आहे. या पत्रातून संबंधित शिवसेना शिंदे गटाच्या नेत्याच्या मुलाच्या हत्येचा कट शिजत असल्याची माहिती देण्यात आली आहे. मुलाची हत्या करण्यासाठी सुपारी दिली असून त्या संदर्भात एक मिटींग पार पडली आहे, असा दावा देखील या पत्रातून करण्यात आला आहे. हे पत्र मिळाल्यानंतर राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. पत्र मिळलेल्या नेत्याचं नाव संजय गायकवाड असून ते बुलढाण्याचे आमदार आहेत. संजय गायकवाड यांचा धाकटा मुलगा मृत्यूंजय गायकवाड याच्या जीवाला धोका असल्याचं पत्रात म्हटलं आहे. विशेष म्हणजे यापूर्वी दोन वेळा अशाच प्रकारचं पत्र गायकवाड यांना मिळालेलं आहे. आता तिसऱ्यांदा हे पत्र मिळाल्यानंतर गायकवाड यांनी याप्रकरणी कारवाई करण्याची मागणी आहे. अज्ञात व्यक्तीने हे पत्र पाठवलं असल्याची माहिती आहे.

तुम्हाला पत्र लिहिण्याचे कारण की, तुम्हाला एक गोपनीय माहिती द्यायची आहे. तुमचे जुने सहकारी समाधान मोरे व त्यांचा भाचा रितेश खिल्लारे यांच्यामुळे तुमचा धाकटा मुलगा मृत्यूंजय गायकवाडच्या जीवाला धोका आहे. त्याला मारण्याची सुपारी घेतली असून ते त्या कार्यासाठी सक्रीय झाले आहेत. त्यांची अशी एक मिटिंग देखील झाली आहे. तरी आपण व आपले कुंटुंब त्यांचे रक्षण करावे. मी त्याच्या जवळची व्यक्ती असून मी प्रकट स्वरूपात येऊ शकत नाही. तुम्ही तुमच्या कुटुंबाच्या सुरक्षिततेसाठी लवकरात लवकर पाऊल उचलावे. वेळ निघून गेल्यावर काहीही उरणार नाही. छत्रपती शिवाजी महाराज आपले दैवत आहे. तुमचे आणि माझे ही. शिवरायांच्या चरणाची शपथ हा मजकूर खोटा नाही. आपण सतर्क राहावे." या पत्राच्या शेवटी अज्ञात व्यक्तीने टीपही लिहिली आहे. त्याने टीपमध्ये लिहिलं की, पत्रातील मजकूर हा खोटा नसून हा सत्य आहे. यामध्ये माझा कोणताच वैयक्तिक फायदा नाही. केवळ तुमच्या कुटुंबाप्रती काळजी आहे, म्हणून पत्राद्वारे तुम्हाला कळवत आहे. मृत्यूंजय दादांची काळजी घ्या, आई भवानी त्यांना उदंड आयुष्य लाभो हीच प्रार्थना, आपला शुभचिंतक असा मजकूर या पत्रामध्ये लिहण्यात आलेला आहे. दरम्यान यापूर्वी देखील २ अशीच पत्र आल्याने आमदार संजय गायकवाड यांनी आता या प्रकरणात कारवाईची मागणी केली आहे. या संदर्भात ते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी देखील बोलणार आहेत. मात्र हे पत्र कोणी पाठवलं, हे अद्याप समोर येऊ शकलेलं नाही. मात्र या घटनेने खळबळ उडाली आहे.

## प्रभू रामाच्या पावलावर पाऊल ठेवून भाजपाने चालावे - उद्धव ठाकरे

**मुंबई, दि. ६ प्रतिनिधी**

भाजपाचा वर्धापन दिन तिथीप्रमाणे, तारखेप्रमाणे की सोयीप्रमाणे- आहे? अशी खोचक टीका उद्धव ठाकरे यांनी केली आहे. रामनवमी हा तुमच्या पक्षाचा जन्मदिवस असेल तर प्रभू रामचंद्र वागले असतील तसं वागण्याचा प्रयत्न करा एवढ्याच माझ्या शुभेच्छा आहेत. असं उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे.



रामनवमी असल्याने वर्धापन दिन भाजपा साजरा करते आहे का? रामाच्या पावलावर पाऊल ठेवून चाला असं उद्धव ठाकरेंनी म्हटलं आहे. एसंशिच्या आरोपांवर मला काही बोलायचं नाही असंही उद्धव ठाकरे म्हणाले, पुढे बोला. वक्फ बोर्डाच्या विधेयकाबाबत जर काँग्रेसला कोर्टात जायचं असेल तर ठीक आहे आम्ही (शिवसेना, उद्धव बाळासाहेब ठाकरे) कोर्टात जाणार नाही. असंही उद्धव ठाकरेंनी स्पष्ट केलं आहे.

भाजपाला शुभेच्छा देताना मी पुन्हा सांगतोय प्रभू रामाप्रमाणे वागा. निवडणूक जिंकण्यासाठी लाडकी बहीण योजनेचे पैसे वाढवू सांगितलं होतं, शेतकऱ्यांना कर्जमाफी होईल सांगितलं होतं, प्राण जाये पर वचन न जाए हे सांगण्याची गरज आहे. भाजपाने लोकांना फसवून मतं घेतली आहेत. रामाचं नाव घेण्याची या लोकांची पात्रता नाही असं मला वाटतं. माणिकराव कोकाटे यांच्यावर फसवणुकीचा आरोप आहे. कोर्टाने त्यांना आश्चर्यकाररित्या सोडवलं आहे असंही उद्धव ठाकरे म्हणाले.

मराठी बाबत आमची भूमिका स्पष्ट आहे. चला मराठी शिकू या असा उपक्रम आम्ही सुरु केला आहे. ज्यांना राहायचं आहे त्यांनी याचा लाभ घ्यावा. उत्तर भारतीयांना मराठी शिकवण्यासाठीचा हा उपक्रम आहे असं म्हणत उद्धव ठाकरेंनी राज ठाकरेंवर बोलणं टाळलं. भाजपाला फक्त जमीन, मालमत्ता आणि व्यापार इतकंच करणं भाजपाचं काम आहे. वक्फची जमीन घ्यायची मित्रांना द्यायची, ख्रिश्चन लोकांची जमीन घ्यायची, जैन समाजाची जमीन घ्यायची आणि मित्रांना द्यायची हेच त्यांचं धोरण आहे. वक्फ बोर्ड आणि हिंदूंचा काही संबंध नाही यांना कुणाला कुणाबाबत बोलण्याचा अधिकार नाही. ऑर्गनायजरने यांचा छुपा अजेंडा बाहेर आणला असंही उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे.

## स्वातंत्र्याला 80 वर्षे पूर्ण होत आहेत, तरीही सरकारी नोकऱ्यांचा तुटवडा
### सर्वोच्च न्यायालयाने कडक शब्दात फटकारले

**नवी दिल्ली, दि. ६ वृत्तसंस्था**

सर्वोच्च न्यायालयाने आपल्या महत्त्वाच्या निर्णयात सरकारी नोकऱ्यांच्या कमतरतेवर भाष्य केले आहे. देशाला स्वातंत्र्य मिळून ८० वर्षे पूर्ण होत असतानाही सार्वजनिक क्षेत्रात पुरेशा नोकऱ्या निर्माण करणे हे एक कठीण लक्ष्य असल्याचे न्यायालयाने म्हटले आहे. सरकारी नोकरीत सहभागी होऊ इच्छिणाऱ्यांना नोकऱ्या देणे कठीण झाले आहे. देशात पात्र उमेदवारांची कमतरता नाही आणि हे लोक रांगेत आहेत, परंतु तरीही पुरेशा रोजगाराच्या संधी नसल्यामुळे त्यांचा सार्वजनिक क्षेत्रातील नोकरीचा शोध अयशस्वी होतो. न्यायमूर्ती दीपंकर दत्ता आणि न्यायमूर्ती मनमोहन यांच्या खंडपीठाने २ एप्रिल रोजी दिलेल्या निर्णयात ही टिप्पणी केली. खरं तर, पाटणा उच्च न्यायालयाने बिहार राज्य सरकारचा नियम असंवैधानिक म्हणून घोषित केला होता, ज्यामध्ये चौकीदारांच्या पदावर वंशपरंपरागत नियुक्तीला परवानगी होती. पाटणा उच्च न्यायालयाने हा नियम फेटाळला होता. उच्च न्यायालयाच्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले. सर्वोच्च न्यायालयाने पाटणा उच्च न्यायालयाचा निर्णय कायम ठेवला.

सध्याच्या प्रकरणानुसार, बिहार चौकीदारी संवर्ग (सुधारणा) नियम, २०१४ च्या नियम ५(७) मधील तरतुदी (अ) नुसार, सेवानिवृत्त चौकीदाराला त्याच्या जागी नियुक्त करण्यासाठी आश्रित कुटुंबातील सदस्याची नियुक्ती करण्याची परवानगी होती. या तरतुदीला औपचारिकपणे आव्हान दिले गेले नसतानाही पाटणा उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने घटनेच्या कलम १४ (समानतेचा अधिकार) आणि कलम १६ (सार्वजनिक रोजगारातील समान संधी) चे उल्लंघन म्हणून ही तरतूद रद्द केली.

त्यानंतर या निर्णयाला बिहार राज्य दफादार चौकीदार पंचायत (मगध विभाग) च्या वतीने सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले. मात्र, याचिकाकर्ता संघटना उच्च न्यायालयात पक्षकार नाही. याचिकाकर्त्याने सर्वोच्च न्यायालयात युक्तिवाद केला की, उच्च न्यायालयाने तो नियम घटनाबाह्य ठरवून आपल्या अधिकार क्षेत्राचा ओलांडला आहे. वंशपरंपरागत नियमाच्या वैधतेला न्यायालयासमोर आव्हान दिले गेले नाही. वंशपरंपरागत नियमाच्या वैधतेला आव्हान दिले नसतानाही उच्च न्यायालयाने ते घटनाबाह्य ठरवले.

सर्वोच्च न्यायालयासमोरील महत्त्वाचा प्रश्न असा होता की, उच्च न्यायालयाने स्वत:च्या अधिकाराचा वापर करून, वंशपरंपरागत नियमाला घटनाबाह्य ठरवणे योग्य होते का? सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाचा निर्णय कायम ठेवत अपीलकर्त्याचा हा युक्तिवाद ग्राह्य धरून निकाल दिला. सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की, उच्च न्यायालयाने वंशपरंपरागत नियमाला हरताळ फासण्याचा योग्य निर्णय घेतला, तरीही त्याला औपचारिकपणे आव्हान दिले गेले नाही. सुप्रीम कोर्टाने अनुच्छेद २२६ अंतर्गत स्वतःहून दखल घेऊन गौण कायदेशीर तरतूद असंवैधानिक घोषित करण्याची उच्च न्यायालयाची प्रक्रिया कायम ठेवली.

## खडसेंबाबत मी खुलासा केला तर लोक त्यांना जोड्याने मारतील - गिरीश महाजन

**वाशिम, दि. ६ प्रतिनिधी**

एकनाथ खडसे यांनी मंत्री गिरीश महाजन यांच्यावर केलेल्या आरोपाला आता महाजन यांनीसुद्धा जोरदार उत्तरं दिलं असून. मी जर त्यांच्याबद्दल तोंड उघडलं तर लोक त्यांना बाहेर आल्यावर जोड्याने मारतील. एक नंबरचे महाचोर आहेत. कमरेच्या खाली वार केल्याशिवाय त्यांना दुसरं काही जमत नाही असा पलटवार गिरीश महाजन यांनी केला. आपल्यावर झालेल्या आरोपांवर एक तरी पुरावा दाखवावा, सक्रिय राजकारणातून बाहेर पडेन असं आव्हानही त्यांनी दिले. मी जर एका गोष्टीचा खुलासा केला तर खडसे तोंड काळ करतील. घरातलीच गोष्ट आहे पण मी बोलणार नाही, मला बोलायला लावू नका अशा स्पष्ट शब्दात महाजन यांनी खडसेंना इशारा दिला.

राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार एकनाथ खडसे यांनी एका बातमीचा संदर्भ देऊन महाजनांवर आरोप केले



होते. गिरीश महाजन यांचे एका महिला आयएएस अधिकाऱ्याशी संबंध असून तिचे नाव आपल्याला माहिती आहे असं खडसे म्हणाले होते. त्यावर गिरीश महाजन यांनी प्रत्युत्तर दिले आहे.

'कमरेच्या खाली वार केल्याशिवाय त्यांना दुसरं काही जमत नाही. त्यांची अवस्था किती वाईट आहे हे महाराष्ट्राला माहीत आहे. त्यामुळे मी इतक्या खालच्या पातळीवर जाऊ शकत नाही. मला बोलायचे असेल तर त्यांना बाहेर पडणं मुश्किल होईल. त्यांचे सगळे संपलेले आहे. त्यांचे दुकान बंद झालेले आहे, त्यामुळे वाटेल तशी भाषा करतात आणि बरळतात. महाराष्ट्राला माहीत आहे मी काय आहे.'

'ते नेहमी म्हणतात पुरावे आहेत सीडी आहेत. मी वारंवार त्यांना आव्हान दिलं आहे. त्यांचे जावई तीन वर्षे जेलमध्ये जाऊन आले होते. त्यांच्या पत्नीला मात्र महिला आहे म्हणून आम्ही तुरुंगात जाऊ दिले नाही. त्यांच्याबद्दल लवचिकता दाखवली. विनाकारण कमरेखालची भाषा करायची, घाणेरडे बोलायचे. स्वतः नंबर एकच महाचोर आहेत. त्यांचे सगळे धंदे लोकांना माहित आहेत. मी जर त्यांच्याबद्दल एका गोष्टीची वाच्यता केली तर लोक त्यांना बाहेर आल्यावर जोड्याने मारतील.' 'ते ज्येष्ठ आहेत, वयाने मोठे आहेत. बोलताना त्यांनी माझ्या कामाबद्दल बोलावे, माझ्या भ्रष्टाचाराबद्दल बोलावे. जे सत्य असेल ते बोला. मात्र काही नसताना लोकांना खोट्या बातम्या द्यायच्या. वारंवार ते म्हणतात, त्यांच्याकडे हे आहे, ते आहे. मात्र कशासाठी ते असे करतात? ते लोकांची दिशाभूल करतात. मात्र मी जर काही सांगितले तर लोक त्यांना जोड्याने मारतील. मी त्यांच्या प्रमाणे खालच्या पातळीवर जाऊ शकत नाही. मला कमरेखालची भाषा शोभत नाही, असे महाजन म्हणाले.

## लातूर मनपा आयुक्तांचा डोक्यात गोळी झाडून आत्महत्येचा प्रयत्न

**लातूर, दि. ६ प्रतिनिधी**

लातूर महानगरपालिकेचे आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी स्वतःवर झाडली गोळी झाडून आत्महत्येचा प्रयत्न केल्याचे समोर आले आहे. डोक्यात गोळी लागल्याने ते गंभीररित्या जखमी झाले आहेत. लातूरच्या खाजगी रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.





लातूर महानगर पालिकेचे आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी स्वतःवर गोळी झाडून घेतल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. त्यांच्या पॅराडाईज या शासकीय निवासस्थानी त्यांनी त्यांच्याकडे असलेल्या रिव्हॉल्वरमधून स्वतःवर गोळी झाडून घेतली आहे. गंभीररित्या जखमी अवस्थेत त्यांना लातूरच्या खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. डोक्यात गोळी लागल्याने ते गंभीररित्या जखमी झाले आहेत. त्यांनी स्वतःवर गोळी का झाडून घेतली याचे नेमके कारण मात्र समोर आलेले नाही. पोलिसांनी त्यांच्या निवासस्थानातून रिव्हॉल्वर ताब्यात घेतले आहे.

शनिवारी आपल्या कुटुंबीयासोबत जेवण केल्यानंतर ते त्यांच्या खोलीमध्ये गेले आणि त्यांनी गोळी झाडून घेतल्याची माहिती आहे. फॉरेन्सिर टीम घटनास्थळी दाखल झाली. लातूर जिल्ह्यात बाबासाहेब मनोहरे अत्यंत चांगलं काम करीत आहेत. मात्र अचानक त्यांनी आत्महत्येचं पाऊल का उचलण्याचा प्रयत्न केला, याबाबत नेमकी माहिती कळू शकलेली नाही.

## ग्रामस्थांनी ग्रामपंचायतच विकायला काढली

**जालना, दि. ६ प्रतिनिधी**

जालन्यातील भोकरदन तालुक्यातील पिंपळगाव कोलते ग्रामपंचायत ग्रामस्थांवर अक्षरशः गाव विकण्याची वेळ आहे. गावात वेगवेगळ्या ठिकाणी गाव विकण्या संदर्भात बॅनर, पोस्टर सगळीकडे लावले आहेत. ग्रामस्थांनी एवढं टोकाचं पाऊल का उचलावं लागलं अशी चर्चा सगळीकडे होत आहे.

जालन्यातील कोलते ग्रामपंचायत ग्रामस्थासह माजी ग्रामपंचायत सदस्यांनी विक्रीला काढली आहे. गावकऱ्यांनी ''पिंपळगाव कोलते ग्रामपंचायत विकणे आहे' अशा आशयाचे पोस्टर गावात लावले आहेत. त्यामुळे एकच खळबळ उडाली आहे. सरपंच, उपसरपंच हे गावात विहीर आणि घरकुल वाटप करतांना भ्रष्टाचार करत आहे. त्यामुळे ग्रामपंचायतीच्या कारभाराला वैतागलेल्या गावकऱ्यांनी संपूर्ण गावात ग्रामपंचायत विक्रीला असल्याचे बॅनर सगळीकडे लावले आहेत. दरम्यान पंचायत समितीचे गटविकास अधिकारी आणि जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी याची दखल घ्यावी अन्यथा ग्रामस्थ सामूहिक आत्मदहन करण्याच्या तयारीत असल्याचा ईशारा माजी उपसरपंचांनी दिला आहे.

## महत्त्वाचे

### ‘संस्कारांनी उजळली न्यू इंग्लिश स्कूल, महिरावणीची शाळा!’

**नाशिक ।** न्यू इंग्लिश स्कूल, महिरावणी (इंग्रजी माध्यम) येथे विद्यार्थ्यांसाठी नेहमीच नवनवीन उपक्रम राबवले जातात. त्याचाच एक भाग म्हणून शाळेत विशेष संस्कार वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना नीतिमूल्ये, शिस्त, आदर आणि नैतिक शिक्षणाचे मोल शिकवले गेले. या प्रेरणादायी संस्कार वर्गाचे मार्गदर्शन सुप्रसिद्ध प्रशिक्षक डॉ. अंजना भंडारी यांनी केले. त्या नाशिक येथील अशोका बिझनेस स्कूल मध्ये कार्यरत असून, संस्कार कार्यशाळा,



सूत्रसंचालन आणि साहित्य क्षेत्रातील एक नामांकित व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांची ओळख आहे. संस्कार वर्गात प्रेरणादायी कथा कविता, नैतिक शिक्षण, शिस्त, स्वच्छता, आहार आणि आदरभाव यावर विशेष भर देण्यात आला.विद्यार्थ्यांचे भावविश्व ओळखून त्यांनी दिलेले मार्गदर्शन अत्यंत प्रभावी ठरले त्यामुळे विद्यार्थ्यांनी त्याला मोठा प्रतिसाद देत उत्साहाने सहभाग घेतला. आणि त्यातून मिळालेल्या शिकवणींचा दैनंदिन जीवनात उपयोग करण्याचा त्यांनी संकल्प केला. या उपक्रमासाठी शाळेचे प्राचार्य श्री. एन. एन. शिंदे, पर्यवेक्षिका संगीता पगार, तसेच प्राथमिक व माध्यमिक विभागातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले. संस्कार वर्गाच्या यशस्वी आयोजनाबद्दल विद्यार्थी, पालक वर्गातून समाधान व्यक्त केले जात आहे. भविष्यात अशा उपक्रमांचे नियमित आयोजन करण्याची तयारी व्यवस्थापनाने दर्शवली आहे.

## शिक्षण क्षेत्राचा झालेला बाजार...

आज शिक्षणापासून कुणीही वंचित राहू नये म्हणून ज्या मातेने स्वतः शिकून सर्वांना शिक्षण प्रवाहात आणले व स्वतः हालअपेष्टा, कुचेष्टा दगड-गोटे, शेणाचा सोसला. स्त्रिया फक्त चूल आणि मूल यातच गुरफटून न जाता तिलाही शिक्षणाचा समान हक्क प्राप्त व्हावा. यासाठी हाती धुरा घेतली! त्याचा शिक्षण क्षेत्रात आज झालेला बाजार पाहता... त्या मायमाऊली सावित्रीबाईंना अतीव दुःख होत असेल. शाळेतच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास झाला तर त्याला



क्लासेस लावण्याची गरज भासणार नाही. प्रत्येक शिक्षकाची नैतिक जबाबदारी आहे. आपण पगार घेतो याची जाणीव सर्वांना असली पाहिजे. आपण शासनाला न फसविता स्वतःला फसवत आहोत. प्रत्येक गावात, तालुकास्तरावर, जिल्हास्तरावर अन गल्लीबोळात ज्या इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरू झाल्या आहेत. त्यामुळे मराठी शाळेकडे पालकांचे दुर्लक्ष होऊन इंग्रजी शाळाकडे कल वाढला. चढाओढ निर्माण झाली आहे. त्यामुळे मराठी शाळेचा ऱ्हास होताना दिसून येत आहे. पालकांना इंग्रजी शाळेचे आकर्षण वाढवून जास्तीत जास्त फी भरून आपल्या पाल्याचा प्रवेश निश्चित करताना चित्र संपूर्ण ठिकाणी आपल्याला दिसते आहे. याला जबाबदार कोण? प्रत्येक शाळेत शिक्षणाचा दर्जा भौतिक सुविधा विद्यार्थ्यांचा विकास गुणवत्ता हेच ध्येय ठेवले तर मराठी शाळा टिकतील. दहावी-बारावीतील मुले सर्रास कॉफी करताना दिसतात. याला जबाबदार कोण? अनेक ठिकाणी पेपरफुटीचे प्रकरण बघावयास मिळतात. विद्यार्थ्यांचा बौद्धिक विकास जर ज्ञान अमृताने भरलेला असेल तर त्याला कॉपी करण्याची गरज भासणार नाही. विद्यार्थ्यांच्या विकासासाठी जे ट्रेनिंग प्रशिक्षण शिक्षकांना दिले जाते किती शिक्षक प्रामाणिकपणे लक्षपूर्वक हजर राहून ट्रेनिंग घेतात व घेतलेल्या ट्रेनिंगचा उपयोग विद्यार्थ्यांच्या विकासासाठी करतात. प्रत्येक शिक्षकाने आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. विद्यार्थ्यांना नाविन्यपूर्ण शिक्षण देण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर व शिकविण्याच्या पद्धतीत बदल केला पाहिजे. देशाचा उत्तम नागरिक घडवण्याची काम हे प्राथमिक शिक्षणाकडे सोपविण्यात आले आहे. मातीच्या गोळ्याला आपण जसा आकार देऊ तसा तो घडेल मंदिरांना देणगी देण्यापेक्षा शाळांना देणगी दिली तर शाळेची गुणवत्ता व दर्जा सुधारेल. अध्यापन आणि अध्ययनाच्या शैक्षणिक कामाबरोबर शिक्षकाला अशैक्षणिक कामांचा बोज शासनाने कमी करावा. क्षमता वृद्धी प्रशिक्षण, यु-डायस, सरळ प्रणाली आवश्यक माहिती भरणे, शाळाबाह्य विद्यार्थी सर्वेक्षण, नव साक्षर यांची सर्वेक्षण गैरहजर विद्यार्थी पालकांच्या भेटी, मानके, निपुण भारत ऑनलाईन ऑफलाइन कामे कमी करावी. म्हणजे शिक्षक पूर्ण वेळ विद्यार्थ्यांना देऊ शकेल. मराठी शाळेची गुणवत्ता व विकास भौतिक सुविधा याकडे सरकारने लक्ष घातले पाहिजे तरच मराठी शाळा टिकेल व शिक्षण क्षेत्राचा बाजार थांबेल...

**– सीमाराणी बागुल, नाशिक**

### श्रीरामनवमीच्या पार्श्वभूमीवर रंगावली कलाकाराने रांगोळीने रेखाटलेली सुंदर, बोलकी, सुबक चित्रे...




# रांगोळीच्या माध्यमातून साकारल्या प्रभू श्रीरामचंद्रांच्या प्रतिमा...

**नाशिक ।** रांगोळी आपल्या संस्कृतीची खरी तर ओळख आहे. सकाळी उठले की महिला नियमितपणाने घराच्या समोर विविध प्रकारच्या रांगोळ्या काढतात त्यामुळे मनाची प्रसन्नता वाढली जाते, पण अलीकडे रांगोळीच्या माध्यमातून मातून विविध प्रकारचे सण, उत्सवाच्या निमित्ताने रेखाटन घडू लागले आहे. आज असणाऱ्या रामनवमीच्या निमित्ताने माधुरी पैठणकर या महिला कलाकाराने प्रभू रामचंद्राची प्रतिमा रांगोळीतून रेखाटली आहे.

रामनवमी साजरी करण्यासाठी अगदी एक दिवस उरला आहे. देशभरात रामनवमीची तयारी जोरात सुरू झाली आहे. हिंदू देवता, भगवान श्री रामाचे जन्मस्थान असलेल्या अयोध्या व सर्वत्र रामनवमी साजरी करण्यासाठी सज्ज झाली आहेत. देशाच्या इतर भागांतील भक्त देखील उत्सुक आहेत. हा उत्सव विशेष बनवण्यासाठी विशेषतः 'जय श्री राम' प्रतिमा विविध स्वरूपात रेखाटनेचे प्रयत्न देशभरात केले जात आहेत. या माध्यमातून आपली कला प्रदर्शित करण्याचा होणारा प्रयत्न कौतुकास्पद मानला जातो. त्याच प्रकारे रांगोळी डिझाइन काढणे हा रामनवमी उत्सवाचा अविभाज्य भाग आहे. रामनवमी निमित्त खास रामाची प्रतिमा असलेल्या काही रांगोळी काढू शकता. राम नवमीसाठी रांगोळी डिझाइन, 'जय श्री राम' प्रतिमा, श्री राम नवमी विशेष रांगोळी, राम नवमीसाठी नवीनतम रांगोळी डिझाइन, अयोध्या राम मंदिर प्रतिमा रांगोळीच्या


















माध्यमातून रेखाटन करण्यात आल्या आहेत. राम नवमीच्या दिवशी प्रत्येक घरात रामाची पूजा आणि दिवे लावण्यात येतात. आजकाल आपण सजावटीसाठी अनेक गोष्टींची मदत घेतो. कोणताही सण किंवा शुभ समारंभ आला की आपण घराच्या वेगवेगळ्या भागात रांगोळी काढतो. तुम्ही तुमच्या घराच्या वेगवेगळ्या भागात चमच्याने, थाळीच्या मदतीने सहज बनवले जाता आहेत. या संदर्भात माधुरी पैठणकर यांच्याशी संवाद झालेल्या संवादातून त्या म्हणाल्या की, प्रभू श्रीरामाची रांगोळी डिझाइन जर तुम्हाला वेगवेगळ्या




रंगांचा वापर करून रांगोळी काढायची असेल तर या प्रकारची फ्लोरल डिझाइन रांगोळी योग्य असेल. यासाठी ४ ते ५ रंगांचे कलर कॉम्बिनेशन निवडावे लागेल. फुलांच्या कळ्या काढण्यासाठी माचीस वापरता येईल. रांगोळी काढण्यात एक्सपर्ट असाल आणि तुमच्या घरातील मंदिरात वेगवेगळ्या रंगांच्या साहाय्याने रांगोळी काढण्याचा विचार करत असाल, तर अशा प्रकारे तुम्ही प्रभू श्रीरामाचे चित्र देखील बनवू शकता. तुम्हाला तुमच्या घराच्या अंगणात श्रीराम मंदिराची झलक दाखवायची असेल तर तुम्ही गोल आकारात डिझाईन बनवू शकता, चमचा किंवा माचीस वापरून त्यास योग्य आकार देऊ शकता. चित्राप्रमाणे तुम्हाला श्री राम मंदिर बनवता येईल. श्रीराम असेही लिह शकता. हवे असल्यास बॉर्डरसाठी रंगीबेरंगी फुलेही बनवू शकता. हे करण्यासाठी, आपण प्लेटची मदत घेऊ शकता. रांगोळीची सोपी आणि सुंदर डिझाईन काढायची असेल तर अशा प्रकारे धनुष्य बाणाची डिझाईन काढू शकता. त्यामध्ये 'जय श्री राम' असं देखील लिहू शकता. त्यासाठी पांढरा आणि भगवा या दोन रंगांच्या मदतीने ते बनवण्याचा प्रयत्न करा,असेही रांगोळी आर्टिस्ट माधुरी पैठणकर यांनी सांगितले.

> “ग्रामीण भागामध्ये रांगोळी संस्कृती जोपासण्याचे काम मोठ्या प्रमाणावर घडते आहेत. नव्या पिढीसाठी विविध प्रकारच्या रेडीमेड वस्तू बाजारात मिळू लागलेल्या आहेत. त्यामुळे बोटांवर, हातावर असलेली कला विकसित होण्याऐवजी तंत्रज्ञानाच्या माध्यमातून प्रयत्न केले जात आहेत. मात्र बोटाच्या माध्यमातून कला जोपासण्याचा प्रयत्न करण्याची गरज आहे. आपल्या अवतीभोवती घरात असलेल्या वस्तूंचा आधार घेत आपण अत्यंत सुंदर आणि देखण्या रांगोळ्या निर्माण करू शकतो. उत्तम रांगोळी काढता आली तर तो रोजगाराचा भाग बनेल. त्यातून मोठ्या प्रमाणावर ग्रामीण भागातील महिला, पुरुषांना देखील रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ शकतील. **– माधुरी पैठणकर**

# अनेकांना गंडा घालणाऱ्या किशोर भंडारीचा जामीन फेटाळला

## नरेंद्र मोदींच्या नावाखाली नाशिकमध्ये अनेकांना लुटले

नाशिक । राष्ट्रीय नमो सेनेचा प्रमुख असल्याची बतावणी करून आठ कोटी रूपयांचे कर्ज मंजूर करुन देण्यासाठी प्रोसेसिंग फीच्या नावाखाली सुमारे ८० लाख रुपये घेऊन फसवणूक केल्याचा प्रकार नाशिकमध्ये नुकताच उघडकीस आला होता. या प्रकरणी गुन्हे अन्वेशन विभागाने कथित राष्ट्रीय नमो सेनेचा अध्यक्ष व अखिल मराठी पत्रकार परिषदेच्या अध्यक्षासह चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला होता. या गुन्ह्यातील मुख्य सूत्रधार किशोर भंडारी व त्याची दोन्ही मुले या सर्वांचा जामीन नाशिकच्या न्यायालयाने आज फेटाळला. त्यामुळे येत्या दोन दिवसात या सर्वांच्या मुसक्या आवळल्या जाईल असे पोलिसांनी सांगितले.

याप्रकरणी नाशिकमधील अविनाथ थोरात (वय ६५) या व्यावसायिकाने गंगापूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. त्यानुसार पोलिसांनी किशोर बिरदमल भंडारी (वय ६५), मुले योगेश किशोर भंडारी (वय ३९) व श्रीपाद किशोर भंडारी (वय ३५) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला होता. वरील सर्वांनी संगनमताने थोरात यांचीच नव्हे; तर अनेकांची फसवणूक केल्याने नाशिकमध्ये खळबळ उडाली होती. विशेष म्हणजे किशोर भंडारी याने भाजपच्या उपशाखा असलेल्या राष्ट्रीय नमो सेनेच्या राष्ट्रीय कार्यकारिणीवर असल्याची बतावणी करून व महाराष्ट्राचा अध्यक्ष असल्याचे सांगून नाशिकमध्ये अनेकांना गंडा घातला होता. जनमानसात प्रभाव पडावा म्हणून नाशिकच नव्हे तर महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये या संघटनेच्या माध्यमातून



अनेकांना फसवल्याचे वृत्त आहे. नाशिक मध्ये एका पत्रकारालाही गंडा घालण्याचा प्रयत्न भंडारीने केला होता. त्यांच्याकडून देखील पाच लाख रुपये घेतले होते. तथापि, संबंधित पत्रकाराचा राजकीय क्षेत्राशी जवळून संबंध असल्यामुळे जवळपास पाच वर्षानंतर त्यांचे पैसे पुन्हा परत केल्याची घटना देखील घडली आहे. म्हणून संबंधित पत्रकाराने पोलीस ठाण्यात फिर्याद केली नाही. या भंडारीचे नाशिकमध्ये रविवार कारंजा येथे काही नातेवाईक असून त्यांचा देखील या गुन्ह्यात सहभाग असल्याचा पोलिसांना संशय आहे. त्यांना देखील लवकरच अटक होणार आहे. नाशिकच्या अंबड औद्योगिक वसाहतीतील एक उद्योजक सुनील बहाळकर यांना देखील तीन कोटी रुपये कर्ज मिळवून देतो असे सांगून साडेसात लाख रुपये प्रोसेसिंग फी च्या नावाखाली गंडा घातला होता. बांधकाम व्यावसायिक देवेंद्र भालेराव यांनी न्यायालयाच्या आवारात पत्रकारांशी बोलताना सांगितले की, कर्ज मिळेल या अपेक्षेने घरातील दागदागिने मोडून भंडारीला पैसे दिले. परंतु त्याने प्रचंड विश्वासघात केला होता. आता त्याला तुरुंगात घातल्याशिवाय नाशिक मधील आम्ही कुणीही शांत बसणार नाही. न्यायालयाने आमची बाजू ऐकून घेतली व निर्णय दिल्याने आम्ही समाधानी आहोत. फिर्यादीच्या वतीने एडवोकेट विनीत महाजन यांनी काम पाहिले, तर आरोपीच्या वतीने एडवोकेट मंदार भानोसे यांनी काम पाहिले.

### गोळ्या घालून ठार मारण्याची धमकी

बनावट पत्रकार असल्याचे पुण्यातील पत्रकारांनी यापूर्वीच पोलिसांना सांगितले होते कारण किशोर भंडारी हा नेहमी 'मी नमो सेनेचा अध्यक्ष व अखिल मराठी पत्रकार परिषदेचा अध्यक्ष आहे' अशी कहाणी रचत असे विशेष म्हणजे ज्यांनी कुणी पैसे घेतले होते त्यांना ते परत करण्याऐवजी माझे कोणी काहीच वाकडे करुन शकत नाही. कोणी काही प्रयत्न केला तर गोळ्या घालून मारुन टाकील, पण त्याची मजल गेली होती. विशेष म्हणजे अनेक राजकीय पुढाऱ्यांशी सलगी असल्याचे सांगून त्यांच्याबरोबरची छायाचित्रे तो अनेकांना दाखवीत असे. विशेष म्हणजे पैसा गोळा करताना त्याची दोन्ही मुले देखील त्याला या कामी मदत करीत असे. लोकांची फसवणूक करताना गाडीवर चालक म्हणून त्याची मुलेच स्वतः असायची कधीही त्यांनी व्यवहार करताना ड्रायव्हरला बरोबर ठेवले नव्हते. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात आल्यानंतर पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलिस अधिकारी तृप्ती सोनवणे यांनी योग्यप्रकारे तपासाला सुरूवात केली होती. आरोपीला त्याची माहिती मिळताच जामीन घेण्याचा प्रयत्न त्यांनी करून पाहिला परंतु न्यायालयाने त्यांना दणका दिल्याने येत्या दोन दिवसात भंडारी व त्याच्या दोन्ही मुलांना कोणत्याही परिस्थितीत अटक केली जाईल. न्यायमूर्ती बावस्कर यांनी निकाल दिला. सरकारी वकील म्हणून अँड. कडवे यांनी काम पाहिले.

# शिवपुत्र संभाजी महानाट्याच्या प्रचारासाठी सायकल राईड

## नाशिकमध्ये महनाट्याची उत्सुकता वाढली; उत्साही प्रतिसाद

**नाशिक ।** छत्रपती संभाजी महाराज यांच्या शौर्यगाथेचा जागर करणाऱ्या ‘शिवपुत्र संभाजी महानाट्य’ या भव्य सांस्कृतिक उपक्रमाच्या प्रचारासाठी, आजपासून ‘शिवपुत्र संभाजी महाराज सायकल राईड’ ला नाशिकमध्ये उत्साहात सुरुवात झाली.

दि. ३० एप्रिल ते ५ मे २०२५ या कालावधीत साधुग्राम, पंचवटी येथे रंगणार असलेल्या महानाट्याच्या निमित्ताने, ५ एप्रिल ते ५ मे दरम्यान संपूर्ण नाशिक व परिसरात सायकल राईडद्वारे जनजागृती केली जाणार आहे. या राईडचा शुभारंभ रविवारी (दि. ६) सकाळी ६ वाजता नाशिक जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे सरचिटणीस अड. नितीन ठाकरे यांच्या हस्ते छत्रपती संभाजी पुतळा संभाजी महाराज चौक येथून झेंडा दाखवून करण्यात आली.

या उपक्रमाचे आयोजन सॅटरडे संडे ग्रुपमार्फत करण्यात आले असून, गोपाळ पाटील (तळ्याची वाडी व डे केअर शाळेचे संचालक) यांनी या राईडचे संयोजन केले आहे. ३३३ सायकलस्वार शहरातील



विविध भागांतून दररोज सायकल चालवत महानाट्याचा प्रचार-प्रसार करत आहेत. या ७ मजली भव्य रंगमंचावर महानाटयच्या प्रमुख भूमिकेत डॉ. अमोल कोल्हे यांसह १५० कलावंत असणार आहेत

सायकल राइड शुभारंभ सोहळ्यास अनेक मान्यवर उपस्थित होते. पी. एम. सैनी (सेवानिवृत्त अधिकारी, एरवींग), मोहिनी ज्वेलर्सचे संचालक भालचंद्र पावटेकर, कौस्तुभ मेहता, योगेश आडभाई, मनपा जनसंपर्क अधिकारी योगेश कमोद आदींचा यावेळी सन्मान करण्यात आला. ॲड. नितीन ठाकरे, गोपाळ पाटील आणि अन्य मान्यवरांच्या हस्ते सायकलपटूंचाही सत्कार करण्यात आला.




सायकल राईडचा मार्ग सिटी सेंटर मॉल- एबीबी सर्कल- महात्मा नगर- कॉलेज रोड- गंगापूर नाका- अशोकस्तंभ- सी. बी. एस.- त्र्यंबक नाका- कालिदास कला मंदिर असा होता. समारोप कालिदास कला मंदिर येथे झाला. जिथे उपस्थित मान्यवरांनी नाशिककरांना ‘शिवपुत्र संभाजी’ महानाट्य यशस्वी करण्यासाठी सहकार्याचे आवाहन केले. तृप्तीदा काटकर, एस. पी. आहेर, ताजनपुरे, गोविंद शिंदे व अनेक सायकलप्रेमींनी या उपक्रमाच्या यशासाठी अथक मेहनत घेतली. ही सायकल राईड संभाजी महाराजांचे शौर्य, पराक्रम आणि त्यांचे राष्ट्रनिष्ठ विचार समाजात पोहोचवण्यासाठी एक प्रभावी माध्यम ठरत आहे. ‘शिवपुत्र संभाजी’ महानाट्य नाशिककरांसाठी अभिमानाचा आणि प्रेरणेचा ठेवा ठरेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.

# पोलिस आयुक्तांच्या धडाकेबाज कारवाईने शनिवार गाजला

## अवैध सावकारांची दिवसभर झाडाझडती

## वर्दीतील गुन्हेगार युवराज पाटील निलंबित!

**नाशिक | शनिवारचा दिवस नाशिककर आणि पोलीस दलाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वपूर्ण ठरला. शहरात चर्चा होती फक्त पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांनी केलेल्या अवैध सावकारांविरुद्ध धडाकेबाज कारवाईची! या धडक कारवाईने पोलीस आयुक्तांनी नाशिककरांचीच नव्हे तर संपूर्ण दलाची मने जिंकली आहेत. शहरातील गुन्हेगारी कमी करण्याच्या दृष्टीने दिवस-रात्र मेहनत घेणाऱ्या आयुक्तांनी गुन्हेगारांसोबतच अवैध सावकारांना टार्गेट करत धडकी भरवणारी झाडाझडती केली आहे. तर दुसरीकडे गुन्हेगारांशी थेट संबंध असणाऱ्या पोलीस दलातील वादग्रस्त युवराज पाटील याच्याविरुद्ध थेट निलंबनाची कारवाई करत गुन्हेगारांशी सलोखा जपणाऱ्या कर्मचारी व अधिकाऱ्यांना एक प्रकारचा गर्भित इशारा दिला आहे. या दोन घटना शनिवारी चर्चेच्या केंद्रस्थानी होत्या.**



गेल्या अनेक वर्षांपासून शहरातील पिसाळलेल्या काही अवैध सावकारांवर कारवाईचा दंडुका उगारल्याने सावकारांमध्ये अक्षरशः सन्नाटा पसरलेला दिसून येत आहे. काही सावकारांच्या घरी शनिवारी आयुक्तांनी धडक मोहीम राबवत झाडाझडती केली. अचानक झालेल्या कारवाईमुळे शहरातील सावकारांचे अक्षरशः धाबे दणाणले आहे. काही सावकार अजून आयुक्तांच्या रडावर आलेले नसले तरी लवकरच त्यांच्याविरुद्ध कारवाई होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

गेल्या काही वर्षांपासून बांधकाम व्यवसायातील नावाजलेल्या नरेश कारडा विरुद्ध पोलीस आयुक्तांनी गुन्हा दाखल केला. त्यानंतर एक ना अनेक व्हाईट कॉलर माफिया अलीकडच्या काळात पोलिसांच्या रडारवर आलेले नाशिककरांनी बघितले. शहरात सर्वसामान्यांसाठी अत्यंत त्रासदायक ठरलेला अवैध सावकारीचा मुद्दा हा महत्त्वाचा मानून सर्वसामान्य नागरिकांना सावकारांच्या विळख्यातून मुक्त करण्याचा उदात्त हेतू मनात ठेवून पोलीस आयुक्तांनी अवैध सावकारांचे कंबरडे मोडण्यास सुरुवात केली आहे. आयुक्तांनी काही दिवसांपूर्वीच वैभव देवरे आणि त्याच्या कुटुंबियांच्या मुसक्या आवळल्या. देवरेविरुद्ध आलेल्या प्रत्येक तक्रारीची दखल घेत शहरातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये गुन्हे दाखल केले. देवरेविरुद्ध गुन्हा दाखल झाल्यानंतर काही दिवसातच रग्गेल सावकार रोहीत आणि कैलास कुंडलवाल पोलीस आयुक्तांच्या रडारवर आले. रोहित कुंडलवाल याने अनेकांना व्याजाने पैसे देत अत्यंत जुलमी पद्धतीने प्राणघातक शास्त्रांचा धाक दाखवत वसुली केली आहे. रोहीत कुंडलवालच्या जाचाला कंटाळलेले कर्जदार अक्षरशः रडकुंडीला आले होते. कुंडलवाल परिवाराने सर्वसामान्य कर्जदारांना अक्षरशः ओरबाडून खाल्ले. रोहीत कुंडलवालचा रग्गेलपणा हा अनेकांनी पाहिला असून, त्याच्या कचाट्यात अडकलेल्या कर्जदारांची तो अनेक प्रकारे छळवणूक करत असल्याच्या तक्रारी पुढे आल्या. त्यामुळे कुंडलवाल विरोधात आलेल्या तक्रारींची गांभीर्याने दखल घेत आयुक्तांनी क्षणाचाही विलंब न लावता राजकीय वरदहस्त लाभलेल्या रोहीत कुंडलवालच्या मुसक्या आवळल्या. त्यानंतर त्याची प्रत्येक पोलीस ठाण्यात अक्षरशः धिंड निघाली.

सर्वसामान्यांना सावकारी पाशातून मुक्त करण्यासाठी शहरातील वैध आणि अवैध सावकारांविरुद्ध शनिवारी पोलिस आयुक्तांनी मोहीम उघडत झाडाझडती घेतली. यामध्ये माजी नगरसेवक नय्या खैरेसह संजय शिंदे, गोकुळ धडा, प्रकाश अहिरे, सुमित पिंपळे, धनु लोखंडे, राजेंद्र जाधव, कैलास मैंद यांच्या घरी छापे टाकत कोरे चेक, करारनामे, स्टॅम्प, तसेच लाखो रुपये जप्त केले. पोलीस आयुक्तांच्या धडक कारवाईने शहरवासीयांमध्ये आनंद व्यक्त केला जात आहे तर दुसरीकडे अवैध सावकारांचे अक्षरशः धाबे दणाणले आहेत. पोलीस आयुक्तांची कारवाई अगदीच बोटावर मोजण्याइतकेच सावकारांवर केली असून, अजूनही मोठे सावकार बिळात लपून बसलेले आहेत. या सावकारांनी मोठ्या प्रमाणात व्याजाने पैसा वाटलेला असून, यांच्याविरुद्धदेखील लवकरच कारवाई होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. दरम्यान, अवैध सावकारांविरुद्ध तक्रारी करण्याचे आवाहन पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांनी केले आहे. त्यामुळे आगामी काळात मोठे मासे पोलीस कारवाईत अडकण्याची शक्यता वर्तवली जात आहे.



अंमली पदार्थ, गोमांस विक्रीसारख्या गंभीर गुन्ह्यातील आरोपींशी थेट संबंध तसेच गुन्ह्यात सहभागी असल्याचे निष्पन्न झाल्याने पंचवटी पोलीस ठाण्यातील हवालदार युवराज शांताराम पाटील या वर्दीतील गुन्हेगारास पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांनी निलंबित केले असून, त्याला गुन्ह्यातील सहआरोपी देखील केले आहे.

आयुक्तांनी केलेली कारवाईत गुन्हेगारांशी सलोखा जोपासणाऱ्या कर्मचारी व अधिकाऱ्यांना एक प्रकारचा इशारा असल्याचे मानले जाते. कर्तव्य बजावताना युवराज पाटील याने वर्दीचा धाक दाखवून अनेकांना त्रास दिल्याच्या तक्रारी आहेत. त्याची सखोल चौकशी केल्यास त्याचे अनेक गैरकारणामे उघडकीस येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. युवराज शांताराम पाटील हे पोलीस दलातील एक वादग्रस्त नाव असून, गेल्या अनेक वर्षांपासून हा कर्मचारी विविध पोलीस ठाण्यात तसेच गुन्हे शाखेत गेल्या अनेक वर्षांपासून कार्यरत होता. याची कार्यप्रणाली ही नेहमीच संशयास्पद राहिली आहे. गुन्हेगारांशी संबंध जोपासत त्याने आजवर अनेक बेकायदेशीर कामे केल्याचे बोलले जाते. आयुक्तालय हद्दीतील भद्रकाली, इंदिरानगर तसेच शहर गुन्हे शाखेत त्याने सर्वाधिक काळ कामकाज केले आहे. त्यामुळे गुन्हेगारांची सातत्याने संपर्क येत राहिल्याने वर्दीच्या अडून त्याने अनेक गैरप्रकार केल्याची पोलीस दलात चर्चा आहे. पंचवटी पोलीस ठाण्यात कार्यरत असलेल्या युवराज पाटीलवर गुन्हेगारांशी संबंध असल्याच्या कारणावरून गंभीर स्वरूपाचे आरोप होते. आरोप सिद्ध झाल्यामुळे पोलीस आयुक्तांनी त्याला थेट सेवेतून निलंबित केले आहे. पाटील याचे नाशिक शहरातील इंदिरानगर, नाशिकरोड व भद्रकाली पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या एनडीपीएस (अमली पदार्थ विरोधी कायदा) गुन्ह्यातील आरोपींशी थेट संबंध होते. इतकेच नव्हे तर गोवंश कत्तल व वाहतूक करणाऱ्या तस्करांसोबत देखील त्याचे संबंध असल्याचे चौकशीत



उघडकीस आले आहे.

या प्रकरणाची संपूर्ण चौकशी झाल्यानंतर युवराज पाटील याचे अनेक गैरकृत्य उघडकीस आले.त्यामुळे आयुक्तांनी युवराज पाटील याला संबंधित गुन्ह्यामध्ये सहआरोपी केले आहे. अशाप्रकारे वर्दीच्या आडून पोलीसच गुन्हेगारी कारवाया करत असेल तर ही गंभीर बाब असून पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेत वर्दीतील गुन्हेगार असलेल्या युवराज पाटील याला थेट निलंबित केले असून त्याच्या विरुद्ध गुन्हेगारी कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. पोलीस दलात कर्तव्य बजावत असताना नियम व गोपनीयतेचा भंग केला तसेच नियमांचे उल्लंघन करून कर्तव्यात बेजबाबदारपणा करत पोलीस खात्यावर काळीमा लावण्याचे कृत केल्याचा ठपका युवराज पाटील याच्यावर ठेवण्यात आला आहे. त्याला राखीव पोलीस निरीक्षक येथे दिवसातून दोन वेळा हजेरी लावणे बंधनकारक केले आहे. पोलीस आयुक्तांनी केलेल्या कारवाईचे सर्वत्र स्वागत केले जात असून. गुन्हेगारांशी सलोखा व सामंजस्य राखणाऱ्या कर्मचारी व अधिकाऱ्यांचे मात्र आयुक्तांच्या निर्णयाने अक्षरशः धाबे दणाणले आहेत.

पोलिस दलामध्ये गुन्हेगारांशी सलोख्याचे संबंध असलेले अनेक कर्मचारी असून, राजरोसपणे हे कर्मचारी गुन्हेगारांसमवेत वावरतांना आढळतात. बऱ्याच कर्मचाऱ्यांचे अवैध धंदे चालकांसोबत देखील घनिष्ट मैत्रीचे संबंध असून, त्यांची देखील चौकशी करण्याची मागणी पोलिस वर्तुळातून व नागरिकांकडून होत आहे.

# रायगड चौक राम मंदिरात रामनवमी उत्साहात साजरी






**सिडको ।** रामनवमीच्या पार्श्वभूमीवर शहर जिल्ह्यात सर्वत्र रामजन्मोत्सव साजरा करण्यात आला. त्याचाच एक भाग म्हणून सिडकोतील रायगड चौक येथील राम मंदिरातही सकाळपासून दिवसभर भरगच्च धार्मिक-सांस्कृतिक पार पडले.

दुपारी बरोबर १२ वाजता राम जन्मोत्सव साजरा करण्यात आला. "राम जन्मला ग सये.." अशी रामभक्तीच्या गीतांची-भजनांची आळवणी करीत भाविकांनी जय सियारामचा जयघोष केला. पाळण्यातील प्रभू रामचंद्रांच्या प्रतिमेला झोके देत महिला-भगिनींनी रॅम जन्मोत्सवाचा आनंद साजरा केला. भल्या सकाळपासून सुरू झालेल्या कार्यक्रमांच्या रेलचेलीचा समारोप महाप्रसादाने झाला. सायंकाळी ५ वाजता राम लल्लाची सवाद्य पालखी मिरवणूक काढण्यात आली. रॅम जन्मोत्सवानंतर महाआरती होऊन पंजेरी आणि बुंदीचा प्रसाद वाटण्यात आला. यावेळी महालक्ष्मी भजनी मंडळाने बहारदार भजने, रामभक्तीपर गीते सादर केली. या भजनी मंडळात सोपान चौधरी (ढोलवादक), नयना जोशी, पुष्पा चव्हाण, मंगला कुलकर्णी, विजया वाघ, रेखा कोलंबकर, उज्ज्वला आव्हाड, भागीरथी एखे, मनीषा खैरनार आदींचा समावेश होता. रायगड चौकात दरवर्षी अतिशय उत्साहात रामनवमी उत्सव साजरा केला जातो.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी श्रीराम भक्त मंडळ, रायगड चौक येथील अंबादास संधान, गोविंद शिंपी, हरिभाऊ आढाव, मनोज उशीर, लक्ष्मण गोसावी, गजानन बच्छाव, गोपाळ शेळके, अनिल राजपूत, साहेबराव पवार, उमेश पंचभाई, प्रकाश माळी, मोहन आवारे, अनिल चव्हाण, शिवाजी शिंदे, शिवा संधान, सूरज आढाव, किरण भावसार, अमित शिंपी, आकाश भावसार, सुनील बत्तीसे आदींसह कार्यकर्ते प्रयत्नशील होते.

# सप्तश्रृंगी देवीच्या चैत्रोत्सवास प्रारंभ

## देवीभक्तांसाठी २४ तास मंदिर दर्शनासाठी खुले



**सप्तशृंग गड ।** साडेतीन शक्तीपीठापैकी आद्य स्वयंभू शक्तिपीठ व लाखो भाविकांचे श्रद्धास्थान आणि पर्यटन स्थळ असलेल्या श्री सप्तशृंगी देवीच्या चैत्रोत्सवाला प्रारंभ झाला.

६ ते १२ एप्रिल दरम्यान चैत्रोत्सव असून, यासाठी विश्वस्त संस्थेच्यावतीने विविध पूजा व विधी संपन्न होत आहेत. भाविकांच्या व्यवस्थेसाठी रामनवमीनिमित्त सकाळी साडेसात वाजता श्री सप्तशृंग निवासिनी देवी ट्रस्टच्या मुख्यकार्यालयात सुवर्ण अलंकारांची विधिवत पूजा विश्वात संस्थेचे अध्यक्ष तथा जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश शबी.व्ही. वाघ यांच्या हस्ते झाली. पूजा ते मंदिरापर्यंत देवीच्या सुवर्ण अलंकारांची व आभूषणांची मिरवणूक काढण्यात आली. सकाळी श्री भगवतीची चांदीच्या मूर्तीची जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश श्रीचंद डी. जगमलानी यांनी सकाळी सात ते नऊ वाजेदरम्यान देवीची पंचामृत महापूजा व महाआरती केली. दुपारी १२ वाजता देवी मंदिरात रामनवमीनिमित्त श्रीराम जन्मोत्सव पूजा करून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. चैत्रोत्सवादरम्यान मंदिर २४ तास खुले ठेवण्यात येणार असून, या दरम्यान दररोज पहाटे काकड आरती, सकाळी पंचामृत महापूजा, दुपार महानैवेद्य आरती व सायंकाळी सांज आरती या तीनही वेळेत भगवतीची आरती होईल. या दरम्यान सकाळ संध्याकाळ ट्रस्टच्यावतीने मोफत भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. वर्षभरात दोन वेळा यात्रा भरणाऱ्या सप्तशृंग गडावर श्री सप्तशृंग देवीच्या यात उत्सवास अनन्यसाधारण महत्त्व असते. या दरम्यान खान्देशातील लाखो भाविक सप्तशृंग गडावर श्री भगवती सप्तश्रृंगी देवीच्या दर्शनासाठी पायी हजेरी लावतात. असा हा उत्सव ६ एप्रिलपासून १२ एप्रिलपर्यंत साजरा होणार आहे. तसेच भाविकांच्या सेवा सुविधेत व निवास व्यवस्थेत विश्वस्त संस्थेच्या वतीने डॉर्मेट्री फैसिलीटी सेंटर (शयनकक्ष सुविधा केंद्र) सुरू झाली आहे. तसेच आद्यस्वयंभू श्री सप्तशृंगी माता: व्ही आर ३६०° तंत्रज्ञानावर आधारित चालचित्रफीत प्रक्षेपण केंद्राचे उदघाटन करून अद्यावत माहिती सुविधा ही भाविकांच्या सेवेत आज लोकार्पण करण्यात केली. या दोन्ही सेवांचे उदघाटन व लोकार्पण न्यायाधीश श्रीचंद डी.जगमलानी व बी. व्ही. वाघ यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी श्री सप्तश्रृंग निवासिनी देवी ट्रस्टचे अध्यक्ष यांच्यासह रोहिदास वारुळे, विश्वस्त ॲड. ललित निकम, ॲड. दीपक पाटोदकर, सौ. मनज्योत पाटील, श्री. भूषणराज तळेकर व डॉ. प्रशांत देवरे, विश्वस्त संस्थेचे व्यवस्थापक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी सुदर्शन दहातोंडे, सहा. व्यवस्थापक तथा कार्यकारी अधिकारी भगवान नेरकर तसेच आद्यस्वयंभू श्री सप्तशृंगी माता : व्ही आर ३६०° तंत्रज्ञानावर आधारित चलचित्रफिती प्रक्षेपण केंद्राच्या संचालक योगेश बांगर, वास्तुविशारद अमोल सावकार, कार्यालयीन अधीक्षक प्रकाश जोशी, इस्टेट कस्टोडियन प्रकाश पगार, जनसंपर्क अधिकारी भिकन वाबळे, बांधकाम पर्यवेक्षक सागर निश्चित, भक्तनिवास पर्यवेक्षक प्रशांत निकम, विद्युत पर्यवेक्षक अशोक जगताप, स्वच्छता विभागप्रमुख रणजित उगले, मुरलीधर गावित, तुषार जाधव, जिल्हा न्यायालय व्यवस्थापक अशोक दारके, व्यापारी संघटना अध्यक्ष अजय दुबे, शांताराम गवळी, गिरीश गवळी, ग्रामपंचायत सरपंच रमेश पवार, उपसरपंच संदीप बेनके, राजेश गवळी, पत्रकार तुषार बर्डे, नीलेश कदम, इम्रान शाह, रघुनाथ जोशी, आदी कर्मचारी व भाविक उपस्थित होते.

## ➤ वाचकांचे मत

### दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटलमधील गर्भवती महिलेचा मृत्यू दुर्दैवी...

पुणे येथील प्रसिद्ध दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटलमध्ये दहा लाख रुपये भरले नाही म्हणून उपचार करण्यास नकार दिल्यामुळे दुसऱ्या हॉस्पिटलमध्ये उपचारादरम्यान तनिषा भिसे या महिलेचा मृत्यू झाला. या घटनेने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. माणुसकीला काळीमा फासणारी ही घटना असून, या घटनेचा विविध संघटनांनी निषेध व्यक्त करून संबंधित दोषी असणाऱ्या डॉक्टरांवर तसेच हॉस्पिटल प्रशासनावर कडक कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे. विशेष म्हणजे दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटल धर्मादाय हॉस्पिटल असून, येथे गरीब व गरजू रुग्णांसाठी राखीव खाटा व सवलतीच्या दरात उपचार होतात. तरीदेखील दहा लाखाची मागणी करणे म्हणजे क्रुरतेचा कळस आहे. यावरून मरण किती स्वस्त झाले आहे व माणुसकीचा कसा अंत झाला हे दिसून येते. ही रुग्णालये शासनाकडून धर्मादायच्या नावावर कोट्यवधीचा मलिदा लाटतात, सवलती मिळवतात, औषध विक्रीत सुद्धा दुपटीपेक्षा जास्त नफा कमवतात. अनेक गैरमार्गाने खासगी व धर्मादाय रुग्णालये रुग्णांची सर्रास लूट करतात. अशा रुग्णालयांची चौकशी होऊन त्यांच्यावर कायद्याचा बडगा उगारला पाहिजे. नियमांचा भंग करीत व बेशिस्तीचे वर्तन करून आपण कसे सेवाभावी आहोत याचा कांगावा अशी हॉस्पिटल करतात. त्यांना कडक शासन झाले पाहिजे. प्रत्येक धर्मादाय रुग्णालयात आरोग्यदूताची शासनाने नेमणूक करावी.

**– श्यामसुंदर झळके, सिन्नर**

# अंबड गाव शाळेत डिजिटल शिक्षण

## आ. सत्यजित तांबे यांच्या निधीतून आधुनिक सुविधा उपलब्ध







**सिडको ।** अंबडगाव शाळेला 'आदर्श शाळा' म्हणत इतर शाळांनीही यापासून प्रेरणा घ्यावी, असे आवाहन केले. "मनपा शाळेच्या उद्घाटनाचा हा माझा पहिला कार्यक्रम असून, येथे आलेले वातावरण आणि शाळेची प्रगती पाहून आनंद वाटतो, असे आयुक्त मनिषा खत्री यांनी सांगितले.

शाळेच्या डिजिटलायझेशनसाठी व आधुनिक शिक्षणसुविधांसाठी ५० लाख रुपयांचा निधी आमदार निधीतून प्राप्त झाला असून, यामधून संगणक कक्ष, प्रयोगशाळा, सुसज्ज ग्रंथालय, संरक्षक जाळी, प्रवेशव्दार आदी सुविधा उभारण्यात आल्या आहेत. याचे उद्घाटन आयुक्त मनिषा खत्री यांच्या हस्ते झाले. नाशिक महानगरपालिका अंतर्गत येणाऱ्या अंबडगाव येथील मनपा माध्यमिक विद्यालयात आमदार सत्यजित तांबे यांच्या आमदार निधीतून साकारलेल्या संगणक कक्ष, प्रयोगशाळा, ग्रंथालय व मॉडेल शाळेच्या भव्य सुविधांचे उद्घाटन शनिवारी उत्साहात पार पडले. मार्गदर्शन करताना सत्यजित तांबे यांनी सांगितले, "चार जिल्ह्यांमध्ये शंभर कोटी रुपये वितरित केले असले, तरी अंबडगाव शाळेचा निधी खऱ्या अर्थाने सार्थकी लागला." त्यांनी मुख्याध्यापक अरुण दातीर व ठेकेदार गौरव जाधव यांचे विशेष कौतुक केले. हा निधी मिळवण्यासाठी गुरूमीतसिंग बग्गा व तानाजी जायभावे यांनी केलेल्या प्रयत्नांचे त्यांनी विशेष उल्लेख केले. या कार्यक्रमात माजी नगरसेवक तानाजी जायभावे, दिलीप दातीर, तानाजी फडोळ, मंदाबाई दातीर, किरण दराडे, दिपक दातीर, राकेश दोंदे, सुभाष गायधनी, शरद फडोळ, शरद दातीर, खंडू दातीर व विद्यार्थ्यांचे पालक उपस्थित होते. गावातील अनेक मान्यवर, नगरसेवक, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक मुख्याध्यापक अरुण दातीर यांनी केले, तर सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन बाळासाहेब आरोटे यांनी केले. सर्व शिक्षकवृंदांनी कार्यक्रमाच्या यशासाठी परिश्रम घेतले.



sukritforyou@ gmail.com












prit00786@gmail.com

अशोकायन...



प्रा. अशोक सारडा, मेहकर
(९४२२३९४३३९)

[illegible]





[illegible]




[illegible]



[illegible]

# शब्दकोडे क्रमांक २०७७



**आडवे शब्द :-**
१) दैववान,
५) वेडावाकडा
८) मेहेरबानी
१०) पाठविलेला
११) अबोलीची माळ
१३) धपाटा
१५) आयुष्य
१६) इमारतीचे बांधकाम करणारा राज
१८) पोष्टऑफिस
१९) उष्ण वा थंड नसलेले (पाणी)
२०) पुष्पदल
२१) वाघूळ
२२) षट
२३) मुस्लीम सरदार
२४) दुसऱ्याच्या मनातील विचार जाणणारा
२६) इंग्रजीत भाजणे
२७) गाढव
२८अ) कणीदार
३०) लवंडणे
३२) एक कंदमूळ
३३) छोटी लढाई
३४) व्रत
३६) मगज
३७) लाकडी जिना
३८) ढोंगी, नट, बहुरुपी
४०) धरा, पकडून ठेवा
४३) वाळवी
४५) दया
४६) लक्ष्मी
४८) बासरी
५०) साठ मिनीटे
५२) कपडालत्ता
५४) आत्याचा मुलगा
५५) शूर पुत्राला जन्म देणारी आई
५७) पृथ्वी
५८) खेळ, क्रीडा
६०) धैर्य, हिंमत
६२) सूर्याचे एक नाव
६३) फुरसत
६४) ** गण **
६७) शेतीतील काम
६९) फलक, टोपली
७०) हार
७१) मृत्यू नसलेला
७२) शेतकरी
७४) न्याय
७५) रत्न
७६) खलातील कुटण्याचे साधन

**उभे शब्द :-**
१) पुरुष
२) महाराष्ट्राचा राजा
३) नकली, खोटे
४) पर्वत
५) वाहणारी हवा
६) प्रेत वाहण्याची ताटी
७) ओटा
९) सुरळीत चालू असलेले काम बंद पाडणे (वा.प्र.)
१२) चकचकीत
१४) पुष्पदल
१७) नमस्कार
१८) हातोहात, त्वरेने
१९) दोन मैलाचे अंतर
२०) अलगुजे
२१) एक चतुर्थांश
२३) आकाश
२४) मळलेला
२५) दया, कीव
२६) न घाबरणारा
२८) टोळेचा प्रमुख
२९) श्रीविष्णुचा बटु अवतार
३१) पायाने अधू असलेला
३२) गाणे गाणारा
३३) उसाचा रस काढणारे यंत्र
३५) सर्प
३९) पोपट
४१) छिद्रातून जमिनीवर पडणारे उन
४२) दरवाजा
४४) अखेरीस
४७) एक सुगंधी वनस्पती
४८) पाप करण्यास घाबरणारा
४९) आई, ज्ञानेश्वर
५१) संतोष, आनंद
५३) पंख
५६) ताल वृक्ष
५९) लाजणारा
६१) सुरक्षित
६२) सुपारी कातरण्याचे साधन
६३) समतल
६५) दृष्टी
६६) मेलेला
६८) फळातील खाद्य
७०) पाय कवितेतील चरण
७३) अभिनेता

(उत्तर उद्याच्या अंकात)

## मागील शब्दकोड्याचे उत्तर



## महासागरच्या वाचकांसाठी...

दैनिक 'महासागर'च्या नाशिक आवृत्तीमध्ये आपल्या वाढदिवसाच्या निमित्ताने आपले पूर्ण नाव, पदनाम फोटोसह पाठविल्यास त्यास विनामूल्य प्रसिद्धी दिली जाईल. - संपादक

## महत्त्वाचे

### भुजबळ पितापुत्र काळाराम चरणी लीन

**नाशिक ।** श्रीराम नवमीच्या निमित्ताने माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ व आमदार पंकज



भुजबळ यांनी आज नाशिकच्या काळाराम मंदिरात प्रभू श्री काळारामाचे मनोभावे दर्शन घेतले. यावेळी ट्रस्टच्यावतीने छगन भुजबळ व पंकज भुजबळ यांचा सन्मान केला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस दिलीप खैरे, शहराध्यक्ष रंजन ठाकरे, प्रदेश कार्याध्यक्ष बाळासाहेब कर्डक, युवक अध्यक्ष अंबादास खैरे,ॲड. चिन्मय गाढे, संजय खैरनार, शंकर मोकळ यांच्यासह पदाधिकारी व भाविक बहुसंख्येने उपस्थित होते.

### अभिनव बालविकास मंदिरमध्ये प्रमाणपत्र वाटप

**सिडको ।** मविप्र समाज संचलित उत्तमनगर येथील अभिनव बालविकास मंदिरमध्ये कर्मवीर डॉ. वसंतराव पवार यांची जयंती प्रेरणा दिन म्हणून साजरी करण्यात आली. यानिमित्त कबबुलबुलच्या गोल्डन ॲरो परीक्षेतील 28 मुले व 28 मुली या सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. सर्वप्रथम मुख्याध्यापिका ज्योती पवार यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. उपशिक्षिका सीमा शेवाळे यांनी डॉ. वसंतराव पवार यांच्या जीवन कार्याविषयी माहिती सांगितली. उपशिक्षक मनोहर गायकवाड यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमासाठी नीलिमा बच्छाव, अर्चना आहेर, सारेखा चौधरी, आशा अहिरे, गायत्री काकडे, दिपाली बागुल, वैशाली घोटेकर, शितल सोळुंके व सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

### शहर-जिल्ह्यात रामनामाचा गजर

**नाशिक ।** मर्यादा पुरुषोत्तम श्री प्रभुरामचंद्र यांचा प्रकटदिन अर्थात रामनवमी रविवारी (दि.६) शहर-जिल्ह्यात अति उत्साहात साजरी झाली. शहरातील काळाराम मंदिरांत रामभक्तांचा महासागर उसळला होता. याशिवाय गोरेराम मंदिर, गोरेराम पर्णकुटी मंदिर यासह शहरातील विविध राम मंदिरे गर्दीने फुलली होती. अनेक ठिकाणी महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. यानिमित्ताने अनेक ठिकाणी धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रम साजरे झाले. भजनी मंडळांनी राम भक्तीच्या गीतांची आळवणी केली. रामनवमीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी गोदा घाटावर स्नानाससाठी गर्दी केली होती. याशिवाय तपोवनातही नागरिक गर्दी करीत होते. सियापती प्रभूरामचंद्र की जय... असा सर्वत्र राम नामाचा जयघोष सुरू होता.

### गणित ऑलिम्पियाड परीक्षेत मराठा हायस्कूलचा १०० टक्के निकाल

**नाशिक ।** मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या मराठा हायस्कूलचा गणित ऑलिम्पियाड परीक्षेचा निकाल शंभर टक्के लागला असून, एकूण २०९ विद्यार्थ्यांनी परीक्षेत घवघवीत यश प्राप्त केले. यापैकी २३ विद्यार्थ्यांनी गोल्ड मेडल प्राप्त केलेले आहे. या सर्व विद्यार्थ्यांचा विद्यालयामध्ये सत्कार करण्यात आला. याप्रसंगी व्यासपीठावर मुख्याध्यापक पुरुषोत्तम थोरात, उपमुख्याध्यापक तथा मविप्र सेवक संचालक चंद्रजीत शिंदे, पर्यवेक्षक रामनाथ गडाख, देविदास भारती, नंदा जाधव उपस्थित होते. या सर्व विद्यार्थ्यांना विना काळे, संगीता जाधव, स्मिता शिंदे व सुनिता पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. सर्व विद्यार्थ्यांचे मविप्रचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे, सभापती बाळासाहेब क्षीरसागर, अध्यक्ष डॉ. सुनील ढिकले, उपाध्यक्ष विश्वास मोरे, देवराम मोगल, दिलीप दळवी, ॲड. लक्ष्मण लांडगे, रमेश पिंगळे, डॉ.सयाजीराव गायकवाड व सर्व संचालक मंडळ, आदींनी अभिनंदन केले.

### आजचा वाढदिवस



**श्री. वासुदेव भगत**
सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी (से. नि.), नाशिक.

# इंदिरानगरच्या आकांक्षा महिला मंडळातर्फे विवाह संस्काराबाबत लघु नाटिका सादर

**नाशिक ।** जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने लाडशाखीय वाणी समाजाच्या इंदिरानगर मधील आकांक्षा महिला मंडळातर्फे विवाह संस्काराबाबत लेखा नगर येथे लघु नाटिका स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.



यामध्ये आजचा समाजातील ज्वलंत प्रश्न व विवाहानंतर येणाऱ्या अडचणी, विवाह जमण्यास होणारा विलंब हा विषय ठेवण्यात आला होता, या स्पर्धेत नाशिक मधून आठ महिला मंडळांनी सहभाग नोंदवून आपल्या नाटिका सादर केल्यात. या नाटकांच्या सादरीकरणातून समाजाला प्रबोधन करण्यात आले. या स्पर्धेचे उद घाटन आ. सीमा हिरे, नगरसेवक सतीश सोनवणे व रश्मी हिरे यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून करण्यात आले.

यावेळी सादर करण्यात आलेल्या आठ नाटिकांमधून सर्वोत्कृष्ट तीन नाटीकांची निवड करून त्यांना रोख रक्कम ट्रॉफी आणि मेडल प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते देऊन गौरविण्यात आले. तर दोन नाटिकांना उत्तेजनार्थ बक्षिसे देण्यात आली. त्यानंतर उपस्थित सर्व महिलांमधून लकी ड्रॉ काढण्यात येऊन तीन भाग्यवान भगिनींना पैठणी देऊन गौरविण्यात आले. याप्रसंगी आ.सीमा हिरे, नगरसेवक सतीश सोनवणे व आकांक्षा महिला मंडळाच्या अध्यक्षा आशा सोनजे यांनी आपली मनोगते व्यक्त केली, यात सतीश सोनवणे यांनी आकांक्षा महिला मंडळामार्फत समाजासाठी नियमित होणाऱ्या प्रबोधन पर कार्यक्रमांची प्रशंसा करून सातत्याने होणाऱ्या कार्यक्रमांसाठी महिला मंडळ हक्काने हॉल ची मागणी करत असते व वेळोवेळी त्वरेने मी हॉल उपलब्ध करून देत असतो असे सांगितले.

आ.सीमा हिरे यांनी महिला मंडळाच्या कार्याचे कौतुक करून सदैव समाजाच्या प्रबोधनासाठी असे कार्यक्रमांचे आयोजन करणे ही काळाची गरज असून आकांक्षा महिला मंडळाने ती गरज अचूक ओळखून विविध उपक्रम राबवत असल्याचे पाहून अत्यानंद होत असल्याचे सांगून आजच्या उपक्रमाचा गौरव करून शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमास समाजातील असंख्य महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ.योगिता शिरोरे यांनी केले तर आभार आशा सोनजे यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आकांक्षा महिला मंडळाच्या अध्यक्षा आशा सोनजे, वर्षा मुसळे, सचिव चारुलता अमृतकर, मनिषा खैरनार, रेखा कोतकर, सारिका सोनजे, जिगीशा महाजन, नीलम बधान, शैलजा बधान, पल्लवी खुटाडे, सुजाता कुडे, प्रभावती बाविस्कर आदी महिलांनी परिश्रम घेतले.

# 'जयभीम पँथर' चित्रपटातून उलगडणार एक थरारक संघर्षाची दमदार कहाणी

**नाशिक ।** दलित, जातीभेद या विषयीच्या संघर्षाची दमदार कथा 'जयभीम पँथर - एक संघर्ष' या चित्रपटातून उलगडणार आहे. या चित्रपटाचा ट्रेलर लाँच करण्यात आला असून, चित्रपटाविषयीची उत्सुकता आता प्रचंड वाढली आहे. महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या औचित्याने ११ एप्रिल रोजी हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे.





भदंत शीलबोधी थेरो यांच्या नवयान ड्रीम फिल्म प्रोडक्शनद्वारे निर्मिती होत असलेला "जयभीम पँथर" एक संघर्ष हा महत्त्वाचा चित्रपट ठरणार आहे. रामभाऊ तायडे हे या चित्रपटाचे सहनिर्माते आहेत. संपूर्ण बौद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारातील भारत निर्माण करण्यासाठी चित्रपट, मालिका अशा माध्यमातून नवनिर्मिती करण्याचा या निर्मिती संस्थेचा मानस आहे. या चित्रपटाचे लेखन आणि दिग्दर्शन निशांत धापसे यांनी केले आहे. प्रोजेक्ट हेड म्हणून संतोष गाडे, कार्यकारी निर्माता बाबासाहेब पाटील आणि कलादिग्दर्शक म्हणून प्रकाश सिंगारे यांनी काम पाहिले आहे. या चित्रपटात अभिनेता गौरव मोरे, चिन्मय उदगीरकर, मिलिंद शिंदे, अभिजीत चव्हाण, सोनाली पाटील, शशांक शेंडे, जयवंत वाडकर, संजय कुलकर्णी, प्रवीण डाळिंबकर, विनय धाकडे, प्रियांका उबाळे अशी तगडी स्टारकास्ट या चित्रपटात आहे. या चित्रपटातील "माझ्या भीमाची जयंती' हे सुप्रसिद्ध गायक आनंद शिंदे यांच्या दमदार आवाजातील गीत चांगलेच गाजत आहे. चित्रपटाचे संगीत, पार्श्वसंगीत रोहित नागभिडे यांचे असून ज्याचे लेखन निशांत धापसे यांनी केले आहे. दलित, शोषित बहुजन समाजातील घटकांवर अत्याचारांच्या पार्श्वभूमीवर क्रांतीची ज्योत पेटवणाऱ्या प्रत्येक बहुजन संघटनेची आणि त्यांच्या संघर्षाची सर्वसमावेशक कहाणी हा चित्रपट मांडतो. जातींमधील संघर्ष, दलितांमधील अत्याचार, बहुजन राजकारण, शिक्षण याचं चित्रण करतानाच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे सामाजिक महत्त्व हा चित्रपट अधोरेखित करतो. आजच्या काळात राजकारण बदलत असताना, जातीय संघर्ष वाढत असताना एक वेगळा सर्वसमावेशक विचार देण्याचा प्रयत्न हा चित्रपट करत असल्याचं ट्रेलरवरून दिसतं आहे. अनुभवी अभिनेत्यांचा अभिनय, कसदार लेखन दिग्दर्शनांमुळे हा चित्रपट प्रेक्षकांना चित्रपटगृहात खेचून आणेल असे वाटते.

# अ. भा. मराठा महासंघाच्या जिल्हाध्यक्षपदी चंद्रकांत बनकर

**नाशिक ।** अखिल भारतीय मराठा महासंघ नाशिकच्या जिल्हाध्यक्षपदी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष राजेंद्र कोंढरे यांच्या मार्गदर्शनाखाली निवृत्त पोलिस अधिकारी चंद्रकांत बनकर व व्यंकटेश मोरे यांची एकमताने निवड करण्यात आली.



अ. भा. मराठा महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष राजेंद्र कोंढरे यांच्या सूचनेनुसार मागील सर्व कार्यकारिणी पदे रद्द करून नवनियुक्त्या करण्याचे ठरविण्यात आले. नाशिक येथे झालेल्या महासंघाच्या सर्वसाधारण सभेत नाशिक जिल्हाध्यक्षपदी चंद्रकांत बनकर, कार्याध्यक्ष राजेंद्र शेळके आणि सरचिटणीस म्हणून ॲड. अनिल गायकवाड, कार्यालयीन प्रमुखपदी सुभाष शेळके यांची निवड करण्यात आली. तसेच युवा जिल्हाध्यक्ष म्हणून व्यंकटेश मोरे, शहराध्यक्ष संजय फडोळ, कार्याध्यक्ष सूर्यकांत आहेर, सरचिटणीस अविनाश वाळुंजे, शहर युवक अध्यक्ष सागर कातड, कार्याध्यक्ष विनोद येवले, विद्यार्थी जिल्हाध्यक्ष

## युवा जिल्हाध्यक्षपदी व्यंकटेश मोरे

गौरव गाजरे आदींची निवड करण्यात आली. यावेळी महिला कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. महिला जिल्हाध्यक्षपदी ॲड. स्वप्ना राऊत, कार्याध्यक्ष रोहिणी उखाडे, सरचिटणीस वनीता मुळाने, तसेच महिला शहराध्यक्षपदी स्वाती जाधव, कार्याध्यक्ष भारती पाटील आणि सरचिटणीस पदी अनिता भामरे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

याप्रसंगी योगेश पाटील, बारकू कोशिरे, अविनाश वाळुंजे, समीर वडजे, रमेश खापरे, बाळासाहेब घडवजे, सागर कातड, अनिल आहेर, ज्ञानेश्वर सुरासे, सागर बागुल, विवेक घडूजे, अमोल जाधव, अक्षय अनवट, विनोद येवले, गिरीश अहिरे, वैभव वडजे, उदय देशमुख, महेंद्र बेहरे, संदीप बरहे, हर्षल पवार, वनिता ढेरिंगे, सुमन हगवणे, पौर्णिमा मोहिते, प्रकाश उखाडे, ओमकार दुगजे, नितीन काळे आदींसह सभासद उपस्थित होते.

# एकदिवसीय कार्यशाळा; कायदेशीर प्रक्रिया आणि सीएसआर निधी संकलनावर सखोल मार्गदर्शन

**सिडको ।** नाशिकमध्ये येत्या शनिवार, १९ एप्रिल रोजी सामाजिक संस्थांसाठी एक महत्त्वाची एकदिवसीय कार्यशाळा नाशिक रोड रेल्वे स्टेशन जवळील माहेश्वरी सभागृह येथे आयोजित करण्यात आली आहे. विठाई फाऊंडेशन आणि रिनोव्हेट इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने ही कार्यशाळा पार पडणार असून, संस्थांचे संस्थापक, व्यवस्थापक, समाजकार्याचे विद्यार्थी आणि कार्यकर्त्यांना संस्थेचे कायदेशीर व्यवस्थापन, सीएसआर प्रकल्प प्रस्ताव लेखन व निधी संकलन या विषयांवर सखोल माहिती मिळणार आहे.

ही कार्यशाळा दोन सत्रांमध्ये विभागण्यात आली आहे. पहिले सत्र संस्था अनुपालन व कायदेशीर प्रक्रिया या विषयावर असून, या सत्राचे मार्गदर्शन सुप्रसिद्ध ॲडव्होकेट टीना पटेल करणार आहेत. संस्थेची नोंदणी, ट्रस्ट,सोसायटी, सेक्शन ८ कंपनीचे कायदे, वार्षिक अनुपालन, आयटीआर, एफसीआरए नोंदणी व त्यासंबंधीच्या अटी-शर्ती याबाबत सविस्तर माहिती या सत्रात दिली जाणार आहे. अनेक सामाजिक संस्था योग्य कायदेशीर प्रक्रिया न ठेवल्यामुळे भविष्यात अडचणींना सामोरे जातात. त्यामुळे हे सत्र संस्थांना कायदेशीरदृष्ट्या सक्षम होण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे.

दुसऱ्या सत्रात सनी पवार हे सीएसआर प्रकल्प प्रस्ताव लेखन आणि निधी संकलन या महत्त्वाच्या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. सीएसआर निधीसाठी प्रस्ताव तयार करताना कोणत्या बाबी लक्षात घ्याव्यात, प्रस्तावाची रचना कशी असावी, त्यासाठी कोणत्या प्रकारचे डेटा, आकडेवारी आणि उद्दिष्ट स्पष्टपणे मांडली पाहिजे, हे स्पष्ट करण्यात येईल. याशिवाय देणगीदारांशी प्रभावी संवाद साधण्याचे तंत्र आणि निधी संकलनासाठी दीर्घकालीन योजना आखण्याच्या पद्धती देखील यामध्ये समाविष्ट असतील. सहभागी संस्थांना प्रकल्प प्रस्ताव तयार करण्यासाठी आवश्यक असलेले फॉरमॅट्स, सॅम्पल्स आणि महत्त्वपूर्ण टिप्सही देण्यात येणार आहेत. या कार्यशाळेत जीबी अकॅडमी अंतर्गत सुरू असलेल्या ऑनलाईन प्रशिक्षण कार्यक्रमांची माहितीही सहभागी संस्थांना दिली जाणार आहे. या विशेष कार्यक्रमांमधून संस्थांना संस्था व्यवस्थापन, लोकसंपर्क, सोशल मीडिया वापर, निधी संकलन आणि परिणाम मापन यांसारख्या विविध बाबींवर प्रशिक्षित करण्यात येईल. कार्यशाळेचे आयोजन करणाऱ्या रेनोवेट इंडियाचे सह-संस्थापक अलोक कदम आणि विठाई फाऊंडेशनचे अध्यक्ष विक्रम धोंगडे यांनी उत्तर महाराष्ट्रातील सर्व सामाजिक संस्थांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे. सामाजिक परिवर्तनासाठी कार्य करणाऱ्या संस्था जर कायदेशीर आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम असतील, तर त्यांचे कार्य अधिक प्रभावी ठरेल, यावर त्यांनी भर दिला.या कार्यशाळेमध्ये सहभागी होण्यासाठी संस्था प्रतिनिधींनी आजच आपली नोंदणी करावी. नोंदणीसाठी अश्विनी ८६५५६५८२५४ यांच्याशी संपर्क साधावा.

# 'आर्यन्स सन्मान चित्रपट-नाटक २०२५' पुरस्कार सोहळ्याची घोषणा

**नाशिक ।** नवीन वर्षात 'आर्यन्स सन्मान चित्रपट-नाटक २०२५' पुरस्कार सोहळा पुन्हा एकदा सिने-नाट्य विश्वातील गुणवंतांचे कौतुक करण्यासाठी सज्ज झाला आहे.

या सोहळ्याच्या निमित्ताने मनोरंजन विश्वात पुरस्कार पटकावण्यासाठी कलाकार आणि तंत्रज्ञांमध्ये चुरस निर्माण झालेली पाहायला मिळेल. 'मराठी कलांचा, गुणांचा प्रतिभा प्रशंसा सोहळा...' अशी बिरुदावली मिरवत, २०२५ मध्येही हा पुरस्कार सोहळा भव्य-दिव्य स्वरूपात पार पडणार आहे. मागील दोन वर्षांच्या कालावधीत मनोरंजन विश्वात तसेच कलाकार-तंत्रज्ञांसोबत रसिकांच्या मनात आपले मानाचे स्थान निर्माण करण्यात यशस्वी झालेल्या या पुरस्कार सोहळ्याचे हे तिसरे वर्ष आहे. दुसऱ्या वर्षातील 'आर्यन्स सन्मान चित्रपट-नाटक' पुरस्कार सोहळ्यात गीत-नृत्याच्या माध्यमातून सिनेसृष्टीच्या सुवर्णकाळासोबत भालजी पेंढारकरांपासून सचिन पिळगांवकरांपर्यंत मराठी सिनेसृष्टीतील दिग्गजांना मानवंदना देण्यात आली होती. तिसऱ्या वर्षात पदार्पण करणाऱ्या या पुरस्कार सोहळ्यात अनेक सकारात्मक बदल करण्यात आले आहेत.





पहिल्या आणि दुसऱ्या वर्षाच्या तुलनेत या वर्षी विजेत्यांसाठी पुरस्कारांची रक्कम वाढवण्यात आली असून, ती आता १३,५०,००० रुपये करण्यात आली आहे. यावर्षीच्या सोहळ्यात चार नवीन विभागांचा समावेश करण्यात आला आहे. यंदा चित्रपटांसाठी २२ ऐवजी २४ विभाग, तर नाटकांसाठी १६ ऐवजी १८ विभाग ठरवण्यात आले आहेत. नव्याने समाविष्ट विभागांमध्ये चित्रपटांसाठी 'सर्वोत्कृष्ट नृत्य दिग्दर्शक' आणि 'सर्वोत्कृष्ट विनोदी अभिनेता', तर नाटकांसाठी 'सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेता' आणि 'सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेत्री' हे चार विभाग आहेत. 'आर्यन्स सन्मान चित्रपट-नाटक २०२५'साठी १ जून २०२४ ते ३० जून २०२५ या कालावधीत सेन्सॉर किंवा प्रदर्शित झालेले चित्रपट आणि नाटकांचे प्रवेश अर्ज पाठवता येतील. अर्ज स्वीकारण्यास ५ एप्रिल २०२५ पासून सुरुवात होईल, तर ५ जून २०२५ ही अर्ज पाठवण्याची अंतिम तारीख आहे. मूळ पुण्यात असलेल्या 'आर्यन्स ग्रुप ऑफ कंपनीज्'ने विविध क्षेत्रांमध्ये आपला विस्तार केला आहे.

# उदयोन्मुख उमदा कलाकार- दीक्षांत मोरे

लहानपणापासून अंगी असलेल्या कलागुणांना कुठंतरी, केव्हातरी वाव मिळाला, संधी मिळाली तर कलाकार वृत्तीचा व्यक्ती आपल्यातील कलेला कसदारपणे सादर केल्याशिवाय राहत नाही. अशाच कलाकारांपैकी एक म्हणून दीक्षांत प्रकाश मोरे याचे नाव घेता येईल. कमी वेळेतही या कलाकाराने चांगली मेहनत घेऊन अभिनयाचे सादरीकरण केले आहे.











लहानपानापासून अभिनयाची आवड असली तरी संधी मिळत नव्हती. कोरोनानंतर मात्र दीक्षांतला तशी संधी मिळाली अन त्याने सिरियल्स, वेब सिरीज, मराठी चित्रपटात काम करीत छोट्या छोट्या भूमिकेतून अभिनय केला. त्याने नाशिक येथील मिरेकल्स एक्टिंग अकेडमी येथे काही महिने अभिनयाचा क्लासही केला. सुंदरा मनात भरली या सिरियलमध्ये दीक्षांतने एका दुकानदाराची भूमिका केली. प्रीतीचा वणवा उरी पेटला या सिरियलमध्ये मेडिकलचालक आणि गावकऱ्याची भूमिका केली. तुझे माझे सपान सिरियलमध्ये एक गुंडाची भूमिका केली. इंद्रायणी सिरियलमध्ये दीक्षांतने दोन छोट्या भूमिका केल्या. एक खलनायक आणि ग्रामपंचायतीचा कारकून अशा दोन भूमिका होत्या. मराठी चित्रपट कुंकू पुसले कर्जाने यातही दीक्षांतने ग्रामपंचायतचा शिपाई आणि गवंडी काम करणारा अशा भूमिका केल्या. पाकिस्तानचे यान या नाटकातही त्याने काम केले. त्यात शिरपा नावाच्या गावकऱ्याचे काम केले. हे एक वेडसर असे पात्र होते. नागपूर ते पुणे बस प्रवास या लघुनाट्यात त्याने मुलीची भूमिका केली. तुझे माझे सपान मधली भूमिका त्याला स्वतःला अधिक भावली. ही नकारात्मक भूमिका होती. त्याला अजून याच क्षेत्रात खूप काही करायची इच्छा आहे. भविष्यात एक चांगला कलाकार म्हणून पुढे येण्याची त्याची मनीषा आहे.

या क्षेत्रात खूप अडचणी येतात, संघर्ष करावा लागतो, जीवतोड मेहनत करावी लागते, प्रसंगी घरचे-बाहेरचा विरोधही सहन करावा लागतो; पण हे सर्व करण्याची दीक्षांतची तयारी आहे. कमी कालावधीत दीक्षांतने अभिनय क्षेत्रात चिकाटीने काम केले. त्यामुळे त्याला छोट्याशा का होईना पण विविध भूमिका साकारण्याची संधी मिळाली. एक उदयोन्मुख कलाकार म्हणून त्याच्याकडे पाहिले तर गैर ठरणार नाही.

# कॅलिडोस्कोप

















# सावधान! जागतिक मंदी येतेय विविध रीसर्च फर्म्सचा इशारा



**वॉशिंग्टन, दि. ६ वृत्तसंस्था**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जगभरातील देशांवर टॅरिफ लावले. त्याला प्रत्युत्तर म्हणून आता विविध देशांकडुनही अमेरिकेच्या वस्तुंवर आयातशुल्क लावले जात आहे.

चीनने त्याची सुरवात केल्यानंतर जागतिक व्यापार युद्धाला तोंड फुटले असून याचा विनाशकारी परिणाम जागतिक वित्तीय बाजारांवर झाला आहे. यामुळे जगावर मंदिचे सावट उभे राहिले आहे, असा धोका बहुतांश जागतिक अर्थविषयक संस्थांनी व्यक्त केला आहे.

जागतिक अर्थव्यवस्था मंदीच्या दिशेने जात असून जागतिक मंदीची 60 टक्के शक्यता जागतिक गुंतवणूक संस्था जे पी मॉर्गन ने व्यक्त केली आहे. पूर्वी संस्थेने ही शक्यता 40 टक्के गृहित धरली होती. पण त्यात आता संस्थेने वाढ केली आहे.

चीनने अमेरिकेच्या सर्व वस्तुंवर अतिरिक्त 34 टक्के टॅरिफ लावण्याचा निर्णय जाहीर केला. त्यानंतर जगभरातील शेअर मार्केटमध्ये त्याचे पडसाद उमटले. जे पी मॉर्गन ने स्वतःच केलेल्या भविष्यवाणीत सुधारणा केली आहे. पूर्वी त्यांनी मंदीची शक्यता 40 टक्के वर्तवली होती. आता कंपनीने त्यात 60 टक्के अशी सुधारणा केली आहे. व्यापारविषयक धोरणांमुळे जागतिक स्तरावर व्यवसायांच्या विश्वासावरच परिणाम होईल आणि जगाची आर्थिक वाढ धीमी होईल. वर्षाअखेरीस जागतिक अर्थव्यवस्था मंदीमध्ये प्रवेश करण्याची शक्यता 60 टक्के आहे. अमेरिकेची विकृत व्यापारी धोरणे जागतिक स्तरावर सर्वाधिक धोकादायक आहेत, असे जे. पी. मॉर्गन संस्थेने एका निवेदनात म्हटले आहे.

जे. पी. मॉर्गनच्या निवेदनात म्हटले आहे की, अमेरिकेचे व्यापार धोरण अपेक्षेहून कमी मैत्रीपूर्ण बनले आहे. याचा परिणाम म्हणजे अमेरिकेच्या टॅरिफला मिळत असलेले प्रत्युत्तर. टॅरिफविरोधात होत असलेली कार्यवाही. अमेरिकेच्या धोरणांमुळे पुरवठा साखळी विस्कळीत होईल.

बार्क्लेस, बोफा ग्लोबल रीसर्च, डच बँक, आरबीसी कॅपिटल मार्केट्स आणि यूबीएस ग्लोबल वेल्थ मॅनेजमेंट अशा इतर रिसर्च फर्म्सने देखील इशारा दिला आहे की, ट्रम्प यांच्या नव्या टॅरिफ्समुळे अमेरिकेची अर्थव्यवस्था मंदीमध्ये जाऊ शकते.

अमेरिकेची अर्थव्यवस्था 0.1 ते 1 टक्क्यांनी वाढेल, असे अर्थतज्ज्ञांनी म्हटले आहे. अमेरिकेचे मुख्य स्टॉक मार्केट्स नोव्हेंबरमध्ये ट्रम्पच्या दुसऱ्या कार्यकाळाच्या निवडीनंतर चांगले वाढले होते. परंतु त्यानंतर ट्रम्प टॅरिफ्सची घोषणा झाल्यामुळे वॉल स्ट्रीटवरील मुख्य निर्देशांक 8 टक्क्यांपेक्षा जास्त घसरले आहेत. दरम्यान,एस ॲण्ड पी गोल्बलने त्यांच्या अमेरिकेत मंदीची शक्यता मार्चमध्ये 25 टक्के व्यक्त केली होती. ती सुरवातीला 30 टक्के ते 35 टक्क्यांदरम्यान वाढवली आहे.

गोल्डमन सॅक्सने, एप्रिल 2 च्या टॅरिफ घोषणापूर्वी अमेरिकेत मंदीची शक्यता 20 टक्क्यांवरून 35 टक्क्यांपर्यंत वाढवली. मूलभूत आर्थिक घटक पुरेसे मजबूत दिसत नाहीत, ते कमजोर आहेत, असे त्यांनी म्हटले आहे.

एचएसबीसीने गुरुवारी म्हटले की मंदीची शक्यता अधिक आहे. स्टॉक्स या वर्षाच्या अखेरीस मंदीची 40 टक्के शक्यता दाखवत असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

दरम्यान, काही विश्लेषकांचे म्हणणे आहे की टॅरिफ्समुळे अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्हला अधिक व्याज दर कमी करण्याची संधी मिळू शकते, ज्यामुळे आर्थिक सक्रियता वाढवली जाऊ शकते. जेपी मॉर्गनने म्हटले की, टॅरिफ्सचा परिणाम थोडा कमी होईल कारण फेडरल रिझर्व्ह व्याज दर कमी करू शकते. गोल्डमॅन, नॉमुरा आणि आरबीसी यांसारख्या ब्रोकेरेजेसनी व्याज दर कमी होण्याची शक्यता व्यक्त केली आहे.

# ट्रम्प - मस्क यांच्या विरोधात अमेरिकन नागरिक रस्त्यावर

**वॉशिंग्टन, दि. ६ वृत्तसंस्था**

गेल्या काही दिवसांपासून अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अनेक निर्णयांचा धडाका लावला आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी घेतलेल्या काही मोठ्या निर्णयांमध्ये प्रामुख्याने बेकायदेशीर स्थलांतरितांचा मुद्दा असेल, नवीन टॅरिफ धोरण (आयात शुल्क) असेल किंवा अमेरिकेतील कर्मचारी कपातीचा निर्णय असेल अशा निर्णयांचा समावेश आहे. ट्रम्प यांच्या निर्णयाचा जगभरातील अनेक देशांना फटका बसला आहे. दरम्यान, आता डोनाल्ड ट्रम्प आणि त्यांचे सल्लागार एलॉन मस्क यांच्या विरोधात अमेरिकेत मोठ्या प्रमाणात नागरिक निदर्शने करत असल्याची माहिती समोर आली आहे.

डोनाल्ड ट्रम्प आणि एलॉन मस्क यांच्या धोरणांच्या विरोधात अमेरिकन नागरिक 'हॅन्ड्स ऑफ' असे पोस्टर्स हातात घेऊन रस्त्यावर उतरले आहेत.







सरकारी नोकऱ्यांमध्ये कपातीचा निर्णय, देशाची अर्थव्यवस्था, मानवाधिकार आणि टॅरिफ धोरण अशा मुद्द्यांच्या पार्श्वभूमीवर अमेरिकन नागरिकांनी शनिवारी मोठ्या प्रमाणात मोर्चे काढले आहेत. काही दिवसांपूर्वी युनायटेड स्टेट्समधील सरकारी जमिनींचे व्यवस्थापन आणि माजी सैनिकांची काळजी घेणाऱ्या कर्मचाऱ्यांमध्ये मोठी कपात करण्यात आली, गृह, ऊर्जा, माजी सैनिक व्यवहार, कृषी, आरोग्य आणि मानवी सेवा अशा विभागातील कर्मचाऱ्यांवर बेरोजगारीची कुऱ्हाड कोसळली. अशा वेगवेगळ्या निर्णयांच्या निषेधार्थ आता अमेरिकन नागरिकांनी रस्त्यावर उतरून संताप व्यक्त केला आहे.

तसेच डोनाल्ड ट्रम्प आणि त्यांचे सल्लागार एलॉन मस्क ज्या पद्धतीने देश चालवत आहेत, त्याचा नागरिकांनी निषेध व्यक्त केला आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्या प्रशासनाने घेतलेल्या धोरणांचा विरोध करत निदर्शकांनी आर्थिक धोरणांबद्दल चिंता व्यक्त केली आहे. तसेच काही निदर्शकांनी डोनाल्ड ट्रम्प आपल्याला जागतिक मंदीमध्ये ढकलतील, असंही म्हटलं आहे. दरम्यान, वृत्तानुसार, या आंदोलनामध्ये नागरी हक्क संघटना, कामगार संघटना, वकिल संघटनासह यूएसमधील १५० हून अधिक संघटना आणि हजारो अमेरिकन नागरिक तब्बल १२०० ठिकाणी रस्त्यावर उतरले आहेत.

दरम्यान, डोनाल्ड ट्रम्प सत्तेत आल्यापासून इलॉन मस्क यांच्या नेतृत्वाखाली विभागाने काही निर्णय घेतले आणि त्यामध्ये सामाजिक सुरक्षा प्रशासन प्रादेशिक कार्यालये बंद करणे, स्थलांतरितांना निर्वासित करणे आणि ट्रान्सजेंडर संरक्षण आणि आरोग्य कार्यक्रमांसाठी निधी कमी करणे अशा प्रकारचे निर्णय घेण्यात आल्यामुळे अमेरिकेतील नागरिकांनी आता डोनाल्ड ट्रम्प यांच्या सरकारच्या विरोधात संताप व्यक्त केला आहे.

# बुर्ज खलिफा इमारतीमधील 22 फ्लॅट्सचा मालक आहे भारतीय उद्योगपती

**दुबई, दि. ६ वृत्तसंस्था**

पर्यटक आणि व्यावसायिकांसाठी दुबई हे शहर निर्विवादपणे जगातील एक महत्वाचे डेस्टिनेशन बनले आहे. याच दुबईतील बुर्ज खलिफा ही जगातील सर्वात उंच इमारत आहे. सौंदर्य आणि अलिशान सुविधांचा मिलाफ असलेल्या या इमारतीत 163 मजले आहेत.

ही इमारत पाहण्यासाठी जगभरातून पर्यटक येतात. तथापि, या इमारतीत वास्तव्य करणे सर्वांसाठी शक्य नाही, कारण ते परवडणारे नाही. त्यामुळे ही जागा वास्तव्याच्या दृष्टीने जगातील सर्वाधिक महागड्या ठिकाणांपैकी एक आहे.

वाचून आश्चर्य वाटेल पण याच बुर्ज खलिफा इमारतीत भारतातील एका उद्योगपतीचे एक-दोन नव्हे तर चक्क 22 फ्लॅट स्वतःच्या मालकीचे आहेत. या भारतीय उद्योगपतीचे नाव आहे जॉर्ज व्ही. नेरेम्पराम्बिल. बुर्ज खलीफामधील एका वन बीएचके फ्लॅटचे वार्षिक भाडे 150000 ते 180000 दिरहम (42 लाख रुपयांपेक्षा अधिक) आहे.



विशेष म्हणजे, या इमारतीतील 900 फ्लॅट्सपैकी 150 फ्लॅट्स भारतीयांच्या मालकीचे आहेत. आणि त्यातील 22 फ्लॅट्स एकट्या नेरेम्पराम्बिल यांच्या मालकीचे आहेत. स्थानिक मीडिया जॉर्ज यांना "किंग ऑफ बुर्ज खलीफा" असे संबोधते. 22 फ्लॅट्सच्या मालकीमुळे जॉर्ज हे बुर्ज खलीफामधील सर्वात मोठे खाजगी मालमत्ता मालक आहेत. केरळच्या एका मध्यमवर्गीय कुटुंबात जन्मलेल्या जॉर्ज यांनी वयाच्या 11 वर्षांपासूनच कुटुंबाच्या पालनपोषणासाठी वडिलांसोबत काम सुरू केले होते. जॉर्ज लहानपणापासूनच अत्यंत हुशार होते. त्यांनी कापसाच्या बीजातून गोंद काढून पैसे कमावण्यास सुरुवात केली होती. 1976 मध्ये जॉर्ज यांनी शारजा येथे संधीच्या शोधात स्थलांतर केले. येथे त्यांनी आधी मेकॅनिक म्हणून काम सुरू केले. मिडल ईस्ट देशांतील वाढती अर्थव्यवस्था आणि वाळवंटातील झपाट्याने वाढणाऱ्या उकड्यामुळे एयर कंडीशनिंग व्यवसायात उत्तम संधी आहे, असे त्यांना वाटले.

त्यातून त्यांनी स्वतःची एक छोटी कंपनी सुरू केली. आज ही कंपनी GEO ग्रुप ऑफ कंपनीज म्हणून ओळखली जाते. जॉर्ज आज दुबईचे एक प्रसिद्ध बिझनेस टायकून बनले आहेत. जॉर्ज यांच्या बुर्ज खलीफामध्ये फ्लॅट्स खरेदी करण्यापाठीमागे एक रोचक कथा आहे. एका नातेवाईकाने जॉर्ज यांना टोमणा मारला होता की ते कधीही बुर्ज खलीफामध्ये जाऊ शकणार नाहीत. ते जॉर्ज यांनी खूपच मनावर घेतले. त्यानंतर जॉर्ज यांनी 2010 मध्ये बुर्ज खलीफामध्ये पहिला एक फ्लॅट भाड्याने घेतला. नंतर त्यांनी हळूहळू फ्लॅट्स खरेदी करायला सुरवात केली आणि आज त्यांच्याकडे या इमारतीतील 22 फ्लॅट्स आहेत. मीडिया रिपोर्टनुसार, जॉर्ज यांच्या फ्लॅट्सच्या भिंती, छत आणि फरशीवर गोल्ड प्लेटेड डेकोरेशन केले आहे. जॉर्ज यांची नेटवर्थ 4800 कोटी रूपयांहून अधिक आहे.

# आरवली सोन्सुरे येथे साकारले प्रभू श्रीरामाचे वाळूशिल्प

**वेंगुर्ले, दि. ६ प्रतिनिधी**

रामनवमीचा उत्सव देशभरात मोठ्या उत्साहाने साजरा होत आहे. रामनवमीच्या निमित्ताने वेंगुर्ले तालुक्यातील प्रसिद्ध वाळू शिल्पकार रविराज चिपकर यांनी आरवली सोन्सुरे येथे प्रभू श्रीरामाचे सुंदर वाळूशिल्प साकारले आहे. रामनवमीच्या पूर्वसंध्येला हे वाळूशिल्प पाहण्यासाठी सकाळपासून नागरिकांची तसेच पर्यटकांची गर्दी होत आहे.

या वाळूशिल्पामध्ये श्रीरामाचा मुकुट, धनुष्य, दागिने आदी सूक्ष्म काम असल्याने त्यांना हे वाळू शिल्प घडवायला सुमारे तीन तासाचा कालावधी लागला. गेली अनेक वर्षे ते आरवली सोन्सुरे येथे विविध प्रकारची वाळू शिल्पे साकारत आहेत. गेल्या वर्षभरात त्यांनी गणेश जयंती उत्सव, छत्रपती शिवाजी महाराज जयंती, छत्रपती संभाजी महाराज, श्री गणेश चतुर्थी, महाशिवरात्री उत्सव, एकादशी निमित्त श्री विठ्ठलाचे वाळू शिल्प, आर्मी डे, सावित्रीबाई फुले, शंभर वर्षे पूर्ण झालेले प्रसिद्ध शिल्पकार महाराष्ट्र भूषण राम सुतार यांचे वाळू शिल्प यासारखी अनेक वाळूशिल्पे साकारली आहेत.

त्यांनी सिंधुदुर्गसह जळगाव, मुंबई,



गोवा येथे, वायंगणी कासव महोत्सव आदी ठिकाणी तसेच नुकत्याच देवगड येथे झालेल्या जिल्हास्तरीय कासव महोत्सवात त्यांनी अप्रतिम वाळू शिल्प साकारले होते. ओडिसा येथे आंतरराष्ट्रीय वाळू शिल्प स्पर्धेसाठी महाराष्ट्रातून त्यांची तीन वर्षे निवड झाली होती. त्यांच्या या कलेचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# बिगर-मुस्लिमांचाही वक्फच्या मालमत्तेवर बरोबरीचा अधिकार ! - राज्यपाल आरिफ मोहम्मद खान

**पाटणा, दि. ६ वृत्तसंस्था**



बिहारचे राज्यपाल आरिफ मोहम्मद खान यांनी वक्फ कायद्यातील सुधारणा, वक्फ मालमत्तेचा वापर आणि त्यावरील अधिकारांसंदर्भात मोठे विधान केले आहे. यासंदर्भात त्यांनी आपले मत मांडले आहे. वक्फ मालमत्तेचा वापर गरजू लोकांसाठी व्हायला हवा. तसेच वक्फच्या मालमत्तेवर गरीब मुस्लीम आणि बिगर मुस्लीम या दोघांचाही बरोबरीचा अधिकार आहे, असे राज्यपाल आरिफ मोहम्मद खान यांनी म्हटले आहे. ते पाटणा येथे पत्रकारांशी बोलत होते.

आरिफ मोहम्मद खान म्हणाले, ते जेव्हा उत्तर प्रदेशात मंत्री होते, तेव्हा त्यांच्याकडे वक्फ विभाग होता. या काळात, ते वक्फ मालमत्तांसंदर्भात प्रलंबित प्रकरणे असलेल्या अनेक लोकांना भेटले. ते म्हणाले, वक्फचा अर्थ, आपली मालमत्ता अल्लाहची मालमत्ता म्हणून घोषित करणे. यावेळी त्यांनी प्रश्न केला की, अल्लाहच्या मालमत्तेचा वापर कुणासाठी आणि कोणत्या कामांसाठी व्हायला हवा? यावर त्यांनी स्वतःच उत्तर दिले की, याचा वापर धार्मिक कार्यांसाठी आणि जनकल्याणासाठी व्हायला हवा." याच बरोबर, "वक्फ करणारी व्यक्ती एखाद्या विशिष्ट समुदायाची असू शकते, मात्र वक्फचा लाभ प्रत्येकाला मिळायला हवा. मग तो कोणताही धर्माचा असो," असेही आरिफ मोहम्मद खान म्हणाले.

पुढे बोलताना राज्यपाल आरिफ मोहम्मद खान यांनी कुराणमधील एका 'आयती'चाही उल्लेख केला. ते म्हणाले, "यात गरीब आणि कमकुवत लोकांसाठी दोन शब्द वापरण्यात आले आहेत. एक फकीर (मुस्लीम) आणि दुसरा मिस्कीन (बिगर मुस्लीम). तर विचारण्यात आले की, हे दोन का आहेत? तेव्हा सांगण्यात आले की, फकीर आहे जो निर्धन आहे मुस्लीम आणि मिस्किन आहे, जो बिगर मुस्लीम आहे. दोघांचाही बरोबरीचा अधिकार आहे."

पाटण्यात किती वक्फ मालमत्ता आहेत आणि त्यापैकी किती रुग्णालये किंवा अनाथाश्रम चालवत आहेत? असा प्रश्नही त्यांनी यावेळी उपस्थित केला.

# मिस इंडिया 2024 निकिता पोरवाल जीजेसीची ब्रँड ॲम्बेसेडर




सातव्या इंडिया जेम अँड ज्वेलरीशो चे उद्घाटन मुंबईतील जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटरमध्ये एका भव्य समारंभात झाले. ऑल इंडिया जेम अँड ज्वेलरी डोमेस्टिक कौन्सिल (जीजेसी) या सर्वोच्च उद्योग संघटनेने मिस इंडिया २०२४ निकिता पोरवाल यांना आपली नवी ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून अभिमानाने सादर केले.जीजेएस एप्रिल 2025 मध्ये दागिने उद्योगातील उत्कृष्ट कारागिरी आणि नाविन्यपूर्णतेच्या उत्कृष्ट प्रदर्शनाची सुरुवात आहे. ऑल इंडिया जेम्स अँड ज्वेलरी डोमेस्टिक कौन्सिलतर्फे (जीजेसी) मुंबईतील जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर मध्ये ४ ते ७ एप्रिल २०२५ या कालावधीत या फ्लॅगशिप इव्हेंटचे आयोजन करण्यात आले आहे. अक्षय्य तृतीयेच्या आधी आणि गुढीपाडव्यानंतर लग्नसराईच्या काळात दागिन्यांची मागणी पूर्ण करण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

भव्य उद्घाटन समारंभादरम्यान, या घोषणेने भारताच्या रत्न आणि दागिने उद्योगाची प्रतिभा आणि असाधारण कारागिरी अधोरेखित केली. समाजसबलीकरणासाठी प्रसिद्ध असलेल्या निकिता पोरवाल यांनी श्री हरिसिद्धी ज्वेलर्सच्या सौजन्याने काळ्या रंगाच्या वेशभूषेत मुकुट-दागिने परिधान केले होते. त्या जीजेसीच्या जागतिक राजदूत म्हणून काम करतील आणि भारताचा समृद्ध वारसा आणि नाविन्यपूर्ण डिझाइन्स जागतिक व्यासपीठावर प्रदर्शित करतील.

लोकार्थ

# अवैध विवाहातून जन्माला आलेल्या मुलालाही मिळणार वडिलांची संपत्ती

## उच्च न्यायालयाचा मोठा निकाल

**भुवनेश्वर, दि. ६ वृत्तसंस्था**

आपल्या सभोवताली अनेक वेळा संपत्तीवरून होणारे कौटुंबिक वाद समोर येत असतात. अशा घटना अनेक वेळा न्यायालयापर्यंतही पोहोचतात. यात अनेक वेळा बहुविवाहाचे प्रकरण समोर येते. अशाच एका प्रकरणात ओडिशा उच्च न्यायालयाने एक महत्वाचा निर्णय दिला आहे. "जर एखाद्याचा दुसरा विवाह अवैध घोषित केला असला तरीही, त्या विवाहातून जन्माला आलेल्या मुलांना पित्याच्या संपत्तीत संपूर्ण अधिकार मिळेल. यात केवळ स्वतः अर्जित केलेल्या मालमत्तेचाच नाही, तर वडिलोपार्जित मालमत्तेचाही समावेश असेल," असे न्यायालयाने म्हटले आहे. न्यायालयाने हा निर्णय हिंदू विवाह कायदा आणि हिंदू उत्तराधिकार कायद्यातील तरतुदीनुसार दिला आहे.

खरे तर हे प्रकरण एका ८० वर्षांच्या महिलेच्या याचिकेशीसंबंधित आहे. या वृद्ध महिलेने आपल्या दिवंगत पतीच्या, दुसऱ्या पत्नीच्या मुलांना मालमत्तेपासून दूर ठेवण्यासाठी न्यायालयात धाव घेतली होती. केवळ आपणच मृत व्यक्तीची कायदेशीर पत्नी आहोत, यामुळे केवळ आपल्याच मुलांना मालमत्तेचा अधिकार मिळावा, असा दावा या महिलेने केला होता. मात्र, उच्च न्यायालयाने या महिलेची याचिका फेटाळून लावली.

यासंदर्भात निकाल देताना न्यायालय म्हटले, "हिंदू विवाह कायद्याच्या कलम १६ अंतर्गत, अवैध रद्दबातल आणि वादग्रस्त रद्दबातल विवाहांमधून जन्मलेली मुले देखील कायदेशीररित्या वैध मानली जातात. अशा मुलांना हिंदू वारसाहक्क कायद्यांतर्गत 'क्लास-1 वारस' अथवा 'वर्ग-१ वारस' मानले जाईल. तसेच, त्यांना त्यांच्या पालकांच्या मालमत्तेत संपूर्ण हक्क मिळतील.

तत्पूर्वी, ऑक्टोबर २०२१ मध्ये, कौटुंबिक न्यायालयाने ८० वर्षीय महिलेला मृताची कायदेशीर पत्नी आणि वारस मानून मालमत्तेत अधिकार दिला होता. मृताच्या दुसऱ्या पत्नीने याविरुद्ध उच्च न्यायालयात धाव घेतली होती. तसेच, आपल्याला आपली बाजू मांडण्याचा संपूर्ण अधिकार दिला नाही, असे म्हटले होते. यानंतर उच्च न्यायालयाने सुनावणी करताना स्पष्ट केले की, दुसऱ्या विवाहापासून जन्माला आलेल्या मुलांना संपत्तीपासून वंचित ठेवले जाऊ शकत नाही. मग भलेही तो विवाह वैध नसेल... संबंधित मुलांचा त्यांच्या पित्याच्या संपत्तीत कायदेशीर हक्क राहील. महत्वाचे म्हणजे, हा निर्मय भविष्यात, असे अनेक वाद संपवण्याच्या दृष्टीने महत्वाचा मानला जात आहे.

# ॲप्टेकची लामोर इन्स्टिट्यूट ऑफ ब्युटी, दुबईसोबत हातमिळवणी

ॲप्टेकद्वारे समर्थित लॅक्मे अकॅडमी या भारतातील आघाडीच्या ब्युटी प्रशिक्षण संस्थेने आपल्या विद्यार्थ्यांसाठी, तसेच भावी ब्युटी व वेलनेस महत्त्वाकांक्षींसाठी विशेष इंटरनॅशनल पाथवे प्रोग्रामसह लामोर इन्स्टिट्यूट ऑफ ब्युटी, दुबईसोबत सहयोगाची घोषणा केली आहे. इंटरनॅशनल पाथवे प्रोग्राम दुबईच्या ब्युटी हबमध्ये सर्वोत्तम प्रशिक्षण देतो, ज्यामध्ये स्पेशल इफेक्ट्स मेकअप (एसएपुएक्स)वरील मॉड्यूल्स, फेस व बॉडी पेंटिंग आणि इंटरनॅशनल ब्राइडल टेक्निक्सचा समावेश आहे. दुबईमधील डायनॅमिक ब्युटी लँडस्कपेचे एक्स्पोजर देण्याव्यतिरिक्त हा विशेषरित्या डिझाइन करण्यात आलेला प्रोग्राम लामोर इन्स्टिट्यूट ऑफ ब्युटी, दुबई आणि पोर्टफोलिओ विकासासाठी प्रोफेशनल्स ॲप्टेकद्वारे समर्थित लॅक्मे अकॅडमीच्या आघाडीच्या उद्योग तज्ञांकडून प्रत्यक्ष प्रशिक्षण देतो, तसेच विद्यार्थ्यांना जागतिक ब्राइडल आर्टिस्ट्स, एसएफएक्स स्पेशालिस्ट्स किंवा ब्युटी आंत्रेप्रीन्युअर्स अशा उच्च मागणी असलेल्या व हाय-प्रोफाइल करिअर पदांसाठी सुसज्ज करतो.



पात्रतेनुसार हा प्रोग्राम ॲप्टेकद्वारे समर्थित लॅक्मे अकॅडमीचे ॲडवान्स्ड मेकअप, कॉस्मेटोलॉजी व ग्लोबल ट्रेण्ड्स विद्यार्थ्यांसाठी, इतर संस्थांमधील प्रमाणित ब्युटी प्रोफेशनल्ससाठी, तसेच प्रगत ज्ञान व ब्युटी, हेअर, मेकअप व कॉस्मेटोलॉजीचे टेक्निकल ज्ञान असलेल्या मोठ्या प्रमाणात ब्युटी व वेलनेस समुदायासाठी खुला आहे.

# 2025 च्या पहिल्या तिमाहीत 88,000 हून अधिक निवासी युनिट्सची विक्री

नाइट फ्रँक इंडियाच्या नवीनतम अहवालात, इंडिया रिअल इस्टेट: निवासी आणि कार्यालय (जानेवारी - मार्च २०२५) ने भारतातील निवासी क्षेत्राच्या सतत स्थिरतेवर प्रकाश टाकला. २०२५ च्या पहिल्या तिमाहीत (जानेवारी - मार्च), प्राथमिक निवासी विक्री ८८,२७४ युनिट्सपर्यंत पोहोचली, जी २०२४ च्या पहिल्या तिमाहीपेक्षा २% वार्षिक वाढ आहे. एकूण विक्री स्थिर राहिली, तरी प्रमुख बाजारपेठांमध्ये कामगिरी वेगवेगळी होती. आठ शहरांपैकी पाच शहरांमध्ये विक्रीत वाढ झाली आहे, ज्यामध्ये पुणे आणि चेन्नई यांनी प्राथमिक युनिट विक्रीत अनुक्रमे २०% आणि १०% वार्षिक वाढीसह आघाडी घेतली आहे. मुंबई ही २०१८ च्या पहिल्या तिमाहीनंतरची सर्वाधिक तिमाही विक्री २४,९३० युनिट्सपर्यंत पोहोचली आहे - २०२५ च्या पहिल्या तिमाहीत ५% वार्षिक वाढ आहे.

प्रीमियम गृहनिर्माण विभाग (भारतीय रुपये १० दशलक्ष आणि त्याहून अधिक) हा प्रमुख बाजार चालक होता, जो एकूण विक्रीच्या ४६% होता, जो २०२४ च्या पहिल्या तिमाहीत ४०% होता. या विभागामध्ये १६% वार्षिक वाढ दिसून आली, पहिल्या तिमाहीत ४०,४३२ युनिट्स विकल्या गेल्या. उल्लेखनीय म्हणजे, अति-लक्झरी घरांमध्ये (५०० दशलक्ष रुपये आणि त्याहून अधिक) सर्वाधिक वार्षिक वाढ ४८३% नोंदवली गेली, जी २०२४ च्या पहिल्या तिमाहीत २९ युनिट्सवरून २०२५ च्या पहिल्या तिमाहीत १६९ युनिट्सपर्यंत वाढली. याउलट, ५० दशलक्ष रुपये पेक्षा कमी असलेल्या श्रेणीतील विक्रीत ९% वार्षिक घट झाली, जी मोठ्या आणि अधिक प्रीमियम घरांकडे घर खरेदीदारांच्या पसंतींमध्ये बदल दर्शवते.

# ईडीची 'एल-2 एम्पुरान'च्या निर्मात्याच्या ठिकाणांवर छापेमारी

**चेन्नई, दि. ६ वृत्तसंस्था**

प्रवर्तन निदेशालय (ईडी)ने शुक्रवारी आणि शनिवारी श्री गोपालन चिट अँड फायनान्सेस कंपनी लिमिटेड आणि त्याचे अध्यक्ष गोकूल गोपालन यांच्याशी संबंधित परिसरांमध्ये छापेमारी केली. ही छापेमारी एक हजार कोटी रुपयांच्या परकीय चलन व्यवस्थापन कायदा, १९९९ च्या उलंघनाच्या प्रकरणात केली आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार शुक्रवारी सकाळी तमिळनाडू, केरळ आणि कर्नाटक येथे छापेमारीला सुरूवात झाली. अनिवासी भारतीयांबरोबर व्यावहारांदरम्यान नियमांचे उल्लंघन झाल्याची आणि अनाधिकृत देवाणघेवान झाल्याची माहिती मिळाल्यानंतर ही कारवाई करण्यात आली होती.

दरम्यान शनिवारी ईडीने या छापेमारीत जप्त केलेल्या पैशांचा फोटो सोशल मीडियावर पोस्ट केला आहे. याबरोबरच ईडीच्या अधिकृत अकाउंटवरून या कारवाईबद्दल माहिती देण्यात आली आहे. "ईडी, कोची झोनल ऑफिसने ४ मार्ज २०२५ आणि ५ मार्च २०२५ रोजी फेमा, १९९९ कायद्या अंतर्गत केरळमधील कोझिकोड येथील एका ठिकाणी आणि तमिळनाडूमधील चेन्नई येथील दोन ठिकाणी श्री गोकुलम चिट्स अँड फायनान्स कंपनी प्रायव्हेट लिमिटेडच्या निवासी आणि व्यावसायिक परिसरात शोध मोहीम राबवली. या छाप्यांमध्ये १.५० कोटी रुपये रोख आणि फेमा,१९९९ च्या उल्लंघनासंबंधी कागदपत्रे जप्त करण्यात आली," असे ईडीने म्हटले आहे.

# सोमैया स्कूल ऑफ इंजिनीअरिंगमध्ये २४ तासांचा ॲग्रीटेक हॅकथॉन

के. जे. सोमैया स्कूल ऑफ इंजिनिअरिंग, सोमैया विद्याविहार विश्वविद्यालयाने अलीकडेच एक रोमांचक २४ तासांचा ॲग्रीटेक हॅकथॉन आयोजित केला होता. या हॅकथॉनचे मुख्य उद्दिष्ट भारतीय शेतकऱ्यांना भेडसावत असलेल्या महत्त्वाच्या समस्यांवर चर्चा करणे आणि त्यावर तंत्रज्ञानाच्या साहाय्याने उपाय शोधणे होते. भारतीय कृषी क्षेत्र हे निसर्गाच्या आणि वेळेच्या समस्या, अनिश्चित हवामान, जलवायु परिवर्तनाचे वाढते परिणाम, श्रमिकांची कमतरता, मातीचे आरोग्य कमी होणे आणि अशा विविध आव्हानांचा सामना करत आहे. याशिवाय, पोशाखानाची कमतरता आणि खराब पायाभूत सुविधांमुळे उत्पादनाची मोठ्या प्रमाणावर हानी होत आहे. बाजारातील किंमतींच्या चढ-उतारामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाचे नुकसान होऊन विकावे लागते.




या हॅकथॉनमध्ये १२०० नोंदण्या झाल्या, त्यापैकी ३०० सहभागी निवडले गेले. या ३०० सहभागींपैकी प्रत्येकाने शेतकरी, अभियांत्रिकी आणि व्यवस्थापनाच्या क्षेत्रातील तज्ञांची भूमिका बजावली. हॅकथॉनमध्ये सहभागी झालेले विद्यार्थी आणि शास्त्रज्ञ नवनवीन तंत्रज्ञानाच्या सहाय्याने विविध समस्यांवर उपाय शोधत होते. तंत्रज्ञानाचा वापर करणे आणि त्याचा शाश्वत आणि किफायतशीर वापर करण्यावर भर दिला गेला.

संकलन –संयोजन
**सुबोध रणशेवरे**
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

# 'यॉर्कर किंग' बुमराहचे आयपीएलमध्ये पुनरागमन

**मुंबई, दि. ६ प्रतिनिधी**

आयपीएल २०२५ मध्ये मुंबई इंडियन्ससाठी आनंदाची बातमी समोर आली आहे. मुंबई संघाचा मुख्य खेळाडूंपैकी एक असलेला जसप्रीत बुमराह दुखापतीतून सावरला आहे. तो आरसीबीविरुद्धच्या सामन्यापूर्वी मुंबई इंडियन्सच्या ताफ्यामध्ये सामील झाला आहे. ७ एप्रिल रोजी मुंबई इंडियन्सचा सामना त्यांच्या घरच्या मैदानावर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूशी होईल. तथापि, बुमराह आरसीबीविरुद्ध मुंबई इंडियन्सच्या प्लेइंग इलेव्हनचा भाग होऊ शकेल की नाही याबद्दल अजूनही सस्पेन्स आहे. या घटनेची माहिती मुंबई इंडियन्सने त्याच्या सोशल मिडीया हँडलवर एक व्हिडीओ शेअर करत दिली आहे.

पाठीच्या शस्त्रक्रियेनंतर, बुमराह बीसीसीआयच्या सेंटर ऑफ एक्सलन्स येथे सराव करत होता, जिथून



अलिकडच्या एका अहवालात म्हटले आहे की, त्याच्या पुनरागमनाबद्दल अजूनही सस्पेन्स आहे. पण आता बातमी आली आहे की बुमराह मुंबई इंडियन्समध्ये सामील झाला आहे. बुमराह सामना खेळत असल्याबद्दल, सध्या त्याबद्दल कोणतीही अधिकृत माहिती नाही. पण, तो १३ एप्रिल रोजी दिल्ली कॅपिटल्सविरुद्धचा सामना खेळू शकतो असे मानले जाते.

आयपीएलमध्ये मुंबई इंडियन्सचा विश्वासू वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह याने आपल्या कामगिरीने संघाच्या यशात मोलाचा वाटा उचलला आहे. आतापर्यंत १३३ सामन्यांत १६५ बळी घेतलेले बुमराह मुंबई इंडियन्ससाठी दुसऱ्या क्रमांकाचा सर्वाधिक बळी घेणारा गोलंदाज ठरला आहे. त्याचा बळी मिळवण्याचा सरासरी दर २२.५२ असून त्याने २३ वेळा तीन बळी घेतले आहेत. त्याची सर्वोत्तम कामगिरी ५ बळी केवळ १० धावांत आहे. विशेष म्हणजे, मुंबई इंडियन्सने ज्या हंगामांमध्ये विजेतेपद मिळवले – २०१७ (२० बळी), २०१९ (१९ बळी) आणि २०२० (२७ बळी) – त्या प्रत्येक वेळी बुमराह संघाचा प्रमुख यशस्वी गोलंदाज ठरला. त्याच्या दमदार आणि अचूक माऱ्यामुळेच मुंबई इंडियन्सने पाच वेळा आयपीएलचे विजेतेपद पटकावले आहे.

महासागर NASHIK Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak at S. R. publication, Mohan - Arjun Compund, Godown No. 8, 9 & 10, Near Ghartan Pada, Vaishali Nagar Last Bus Stop, Dahisar (E),Mumbai - 400068 and Published From 'ANANDI', KOTWAL PARK, TILAKWADI, APP. VED MANDEER, DHAMANKAR CORNER, NASHIK 422002 , Editor - SHRIKRISHNA TANSUKHDAS CHANDAK Executive Editor- Sanju Pawar, Resident Editor- Jayant Mahajan.

महासागर नाशिक हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी एस. आर. प्रिंटर्स, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडावून नं. ८,९,१०, घरटन पाडा, वैशाली नगर, दहिसर ईस्ट, मुंबई येथे मुद्रीत करून 'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२ . येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - संजू पवार (मो. नं. ९८९०१०९९७८) निवासी संपादक - जयंत महाजन (९४२०६९१४२०) Email : mumbaimahasagar@gmail.com